४

रमजान मुबारक

आज का इफ्तार
६.३४
कल की सहेर
५.२७

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ८५ वा फोन २३०१०१ दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रविवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 पाने ६ किंमत ४रु.

# एसटीचे अर्धेतिकीट, फुकट प्रवास १ मार्चपासून बंद होणार

# फुकटे बसायचे आणि तिकीट काढणारे उभे राहूनच जायचे

बीड दि.२१ (प्रतिनिधी):– राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेसमध्ये महिलांना अर्धे तिकीट, ज्येष्ठांना फुकट प्रवास होता, मात्र आता १ मार्चपासून हे सर्व बंद होणार आहे. यासाठी शासनाने एक एनसीएमसी कार्ड देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व सवलतधारी प्रवाशांना हे कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. हे कार्ड असेल तरच एसटी तिकीटात सवलत मिळणार आहे. यावरुन प्रत्यक्षात योजना बंद होणार नसली तरी त्याचा थेट लाभ प्रवाशांना घेता येणार नाही. हे कार्ड काढण्यासाठी एवढ्या काही अटी घालण्यात आल्या आहेत की ते कार्ड सहजासहजी मिळेल की नाही आणि अर्धे तिकीट, फुकट प्रवासाची सवलत घेणाऱ्यांना ते कार्ड काढायला, टॉपअप रिचार्ज करायला जमेल की नाही? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. खरं तर शासनाने घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे परंतु फार पुर्वी हा निर्णय घ्यायला पाहिजे होता, कारण अर्धे तिकीट, फुकट प्रवास करणारे एसटी बसमध्ये मस्त बसून प्रवास करायचे आणि तिकीट काढणारे मात्र उभे राहून प्रवास करायचे. या कार्डमुळे कुठेतरी अशा प्रवासाला मर्यादा येतील असे बोलले जात आहे.



एसटी बसमध्ये महिलांसाठी अर्धे तिकीट, ज्येष्ठांसाठी मोफत प्रवास अशा अनेक योजना आहेत, मात्र या योजनांसाठी आता शासनाने एनसीएमसी कार्ड बंधनकारक केले आहे. कार्डाच्या माध्यमातून शासनाने आधुनिक





पाऊल टाकल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र अशा प्रवाशांना आता अर्धे तिकीट, मोफत प्रवासाचा थेट लाभ घेता येणार नाही. आतापर्यंत या योजनांचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड पुरेसे होते,

पान २ वर

## कुठे मिळणार नवं कार्ड

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व विभाग नियंत्रकांना परिपत्र पाठविले आहे. त्यामध्ये एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) बंधनकारक करण्यात येत असल्याचे म्हटले आहे. हे कार्ड कुठल्याही बस स्टॅण्डवर बनवून मिळणार आहे. प्रिपेड वॉलेट सारखं हे काम करणार असून १९९ रुपये त्याची किंमत आहे. त्यात किमान १०० रुपयांचा बॅलेन्स कायम ठेवावा लागणार आहे. यासाठी ५० रुपयांच्या पटीत ते रिचार्ज करता येणार आहे. हे कार्ड थेट आधार कार्डशी कनेक्टेड असल्याने वेगळे आधार कार्ड दाखविण्याची गरज संपणार आहे. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसामान्य महिला, दिव्यांग जन, विविध पुरस्कारप्राप्त व्यक्ती, विविध व्याधीग्रस्त रुग्ण इत्यादींचा समावेश आहे. या कार्डमध्ये सवलतीच्या प्रकारानुसार सवलतीची टक्केवारी, किलोमीटर इत्यादींची माहिती असेल.

# सरपंच, ग्रामसेवकाच्या त्रासाला कंटाळून शिवसेना पदाधिकाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

### चिठ्ठी लिहून घेतला गळफास, उपतालुका प्रमुख देवकतेंची प्रकृती गंभीर



बीड दि.२१ (प्रतिनिधी):- गावचे सरपंच आणि ग्रामसेवक मानसिक त्रास देत असल्याचा आरोप करत शिवसेनेचे उपतालुका प्रमुख भारत देवकते यांनी गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना ढेकणमोहा (ता.बीड) येथे शनिवारी सायंकाळी घडली. शेवटचे क्षण असे म्हणत देवकतेंनी गळ्यात फास घातल्याचे स्टेटस् देखील ठेवल्याचे समोर आले आहे. गळफास घेत असतांना दोर तुटल्याने ते खाली कोसळल्याने ते गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथील शिवसेनेचे उपतालुका प्रमुख भारत देवकते यांनी शनिवारी सायंकाळी घाटसावळी परिसरात पान २ वर

### शेख तय्यब यांच्या पाठपुराव्याला यश

# मौलाना आझाद महामंडळाची शैक्षणिक कर्ज मर्यादा ५ लाखांवरून २० लाखांपर्यंत वाढविली

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी भेडसावणाऱ्या आर्थिक



अडचणी दूर करण्यासाठी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी गेल्या काही महिन्यांपासून राज्य शासनाकडून दिले जाणारे पाच लाखांवरचे शैक्षणिक कर्ज वाढवून द्यावे, अशा आशयाची मागणी तत्कालीन

पान २ वर

# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचच होणार प्रशासक

- राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय
- प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडेंच्या पाठपुराव्याला यश



मुंबई दि.२१ (प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंचांचीच नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील सरपंचांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सरपंच परिषद, मुंबई महाराष्ट्रच्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. सरपंच परिषद प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी या निर्णयाचे स्वागत करत राज्य शासनाचे आभार मानले आहेत.



राज्यातील तब्बल १४ हजार २३४ ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर प्रशासक नियुक्तीचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर लोकशाही पद्धतीने निवडून पान २ वर



# कत्तलसाठी जनावरे वाहतूक करणारा पिकअप अडवला

## विश्वहिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी वाहन आडवून दिले पोलिसांच्या ताब्यात

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- कत्तलीसाठी जनावरे वाहतूक होत असलेल्या संशयावरून विश्व हिंदू परिषद च्या कार्यकर्त्यांनी सतर्कता दाखवत एक पिकअप वाहन अडवले. ही घटना बीड शहरातून नेकनूरकडे जाणाऱ्या मार्गावर बीड-पाली रोडवरील खजाना विहिरीजवळ घडली.




दिनांक २१ फेब्रुवारी शनिवार रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास MH 47 E 2224 क्रमांकाच्या पिकअपमधून जनावरे नेली जात असल्याची माहिती कार्यकर्त्यांना मिळाली. त्यानंतर संबंधित वाहन अडवून तात्काळ डायल ११२ वर संपर्क साधत पोलिसांना कळविण्यात आले. माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ६ जनावरे असल्याचे आढळून आले. वाहन चालकाकडे जनावर वाहतुकीचा परवाना किंवा जनावरांची दाखले मागण्यात आली परंतु वाहन चालकाने कोणतीही कागदपत्र न दाखवल्याने त्याला बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात चौकशीसाठी आणण्यात आले.

दरम्यान, बीड परिसरात कत्तलीसाठी जनावरे वाहतूक होत असल्याच्या तक्रारी वारंवार येत असल्याचे सांगण्यात येत आहे. याबाबत सतर्क राहून काही वाहने अडवण्यात आली असून संबंधित जनावरे गोशाळेत हलविण्यात आल्याची माहिती कार्यकर्त्यांनी दिली.

या कारवाईवेळी गोसेवा गतिविधि देवगिरी प्रांताचे आनंदजी बार्शीकर, बीड शहरमंत्री प्रशांत डोरले, धर्मजागरण गटाचे किशनसिंग चौहान यांच्यासह विश्व हिंदू परिषदेचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# खानापुरचे सरपंच व उपसरपंच अपात्र घोषित

## –जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा निर्णय

बीड दि.२१ (प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यातील खानापूर येथील विद्यमान सरपंच पंडित बाजीराव आबुज आणि विद्यमान उपसरपंच सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांना पदावरून अपात्र घोषित करण्यात आलंय. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १८ फेब्रुवारी रोजी हा निकाल दिलाय. नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत ते निवडून आले होते. या दोघांनी ग्रामपंचायतीच्या जागेवर अतिक्रमण केल्याचं सुनावणीत सिध्द झालं. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना पदावरून हटवलं आहे.

विकास खंडू कांबळे यांनी १८ जानेवारी २०२४ रोजी सरपंच पंडित बाजीराव आबुज आणि सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १६ (२) प्रमाणे व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (१) उपकलम (छ) अन्वये सरपंच/उपसरपंच पद रद्द करावे याबाबत बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल दाखल केले होते. प्रकरणात कांबळे यांच्यावतीने ॲड. व्ही.सी. मिसाळ यांनी बाजू मांडली. प्रकरणात एकूण १८ तारखा पडल्या होत्या. ११ डिसेंबर २०२५ प्रकरणात अंतिम सुनावणी झाली. आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आपला निर्णय राखून ठेवला. शेवटी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रकरणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी निर्णय देत सरपंच पंडित आबुज आणि उपसरपंच सोजरबाई क्षीरसागर यांना अपात्र घोषित करण्यात आले.

जिल्हाधिकाऱ्यांनी काय निष्कर्ष नोंदवले ?

- सरपंच पंडित आबुज यांना पुनर्वसन विभागाकडून प्लॉट क्र. २२ ज्याचं क्षेत्रफळ ६००० चौरस फूट मिळाला होता. तथापि ग्रामपंचायत अभिलेखा (नमूना नं. ८) मधील मालमत्ता क्रा. १७४ संदर्भात नोंदीत व्हाईटनर लावून फेरफार केल्याचे गटविकास अधिकारी माजलगाव यांच्या चौकशीत अहवालात स्पष्ट झालं.
- पंडित आबुज यांचे पुत्र दिगंबर आबुज यांच्या नावे असलेली मालमत्ता क्र. २०८ ही ग्रामपंचायतीच्या उद्यानासाठी राखीव जागा असल्याचे आणि ती विक्री करण्यात आल्याचे गटविकास अधिकाऱ्याच्या चौकशीत सिध्द झाले. ही बाब गंभीर असल्याचे त्यात म्हटले.
- उपसरपंच सोजरबाई क्षीरसागर यांचे पुत्र छगन एकनाथ क्षीरसागर यांनी खानापूर ग्रामपंचायतच्या उद्यानासाठी राखीव असलेल्या जागी ९०० चौरस फुटावर आरसीसी बांधकाम केल्याची बाब देखील गटविकास अधिकाऱ्याच्या चौकशीतून पुढे आली.
- पंडित आबुज आणि सोजरबाई क्षीरसागर यांनी ग्रामपंचायतीच्या उद्यानाच्या आरक्षीत जागेवर अतिक्रमण करणे, अभिलेखातील फेरफार व नोंदणीकृत अतिक्रमण नोंदी, स्वतःच्या व नातेवाईकांच्या नावे ग्रामपंचायतीच्या जागेवर अतिक्रमण करणे या सर्व बाबी ठोस पुराव्यासहीत सिध्द झाल्याचे म्हटले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी निकालात काय म्हटले ?

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी निकाल देताना स्पष्टपणे म्हटले की, विकास खंडू कांबळे यांनी केलेलं अपिल मंजूर करण्यात येत आहे.

सरपंच पंडित आबुज आणि उपसरपंच सोजरबाई एकनाथ क्षीरसागर यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (ज-३) मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द झाले. त्यामुळे त्यांना विद्यमान पदावरून अपात्र ठरविण्यात येत आहे.

जिल्हा अनेक वर्षापासून पंडित आबुज आणि सोजरबाई क्षीरसागर यांनी पदाचा दुरुपयोग करीत उद्यानासाठीची राखीव जागा, व ग्रामपंचायतीचे इतर भुखंड आपल्या रक्ताच्या नातेवाईकांना वाटप केले आहेत. हे सगळं अनेक वर्षांपासून रेकॉर्डवर आहे. नियमबाह्यपणे, बोगस नावे मतदान यादीत लावून त्यांच्या जोरावर वर्षानुवर्षे निवडून येण्याची किमया साधली जायची. पण प्रत्येकवेळी आम्ही दुर्लक्ष करीत गेलो. पण आता एकही बाब नियमबाह्य खपवून घेतली जाणार नाही. ७० टक्के लोकांनी शासकीय जमीनीवर अतिक्रमण करून या जागेवर पक्की बांधकामे केली आहेत. इथून पुढे अतिक्रमण धारकांनी निवडणूकीत उभे राहू नये, असा या निकालाचा अर्थ आहे.

-विकास खंडू कांबळे
ग्रामस्थ, खानापूर

निकाल न देण्यासाठी होता दबाव

२०२३ मध्ये झालेल्या निवडणुकीत मंगल बालासाहेब मारगुडे विरूध्द पंडित साहेबराव आबुज अशी सरपंचदासाठी जनतेतून लढत झाली होती. पंडित आबुज हे जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती कल्याण आबुज यांचे चुलते आहेत. त्यांच्यासाठी माजलगावचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी मारगुडे यांच्या विरोधात आपली ताकद पणाला लावली होती. साम, दाम, दंड अशा सगळ्या नितींचा या निवडणुकीत वापर झाला होता. त्यानंतर मारगुडे यांच्या पॅनलकडून विकास खंडू कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल दाखल केले. या अपिलावर निर्णय होऊ नये, यासाठी आ.सोळंके यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यावर दबाव आणला होता. त्यामुळे त्यांच्या काळात सुनावणी संथ गतीने चालली. नंतर विधानसभा निवडणुकीत कल्याण आबुज यांनी आ.सोळंकेंची साथ सोडली. पण निवडणुकीत होताच सरपंच पद वाचविण्यासाठी त्यांनी पुन्हा आ.सोळंकेंकडे धाव घेतली. आ. सोळंके यांनी विद्यमान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यावर सुनावणी न घेण्यासाठी दबाव आणला होता. परंतु जॉन्सन यांनी दबावाला न जुमानता मेरिटवर निर्णय दिला.

# मुंबईच्या मोर्चात ठेवीदार स्वखर्चाने होणार सहभागी



बीड दि.२१ (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट व पतसंस्थांमधील अडकलेल्या ठेवी परत मिळाव्यात या मागणीसाठी २४ फेब्रुवारी रोजी मुंबईत होणाऱ्या मोर्चात बीडसह राज्यभरातील ठेवीदार स्वखर्चाने सहभागी होणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. ठेवीदार संघर्ष कृति समितीचे मुख्य प्रवर्तकतथा स्वाभिमान संघटना जिल्हाप्रमुख प्रा.सचिनभैय्या उबाळे यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.२१) बीड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत ठेवीदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरपारची लढाई लढण्याचा निर्णय घेतला.

दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, मॉंसाहेब जिजाऊ, छत्रपती, लक्ष्मीमाता अर्बन, आदी मल्टिस्टेट पतसंस्थेसह इतर पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवी तात्काळ परत करण्यात याव्यात, जप्त मालमत्तांचा त्वरित लिलाव करून ठेवीदारांना न्याय द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी २४ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर राज्यस्तरीय मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रा. सचिनभैय्या उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाड्यात शाखानिहाय बैठका घेण्यात येत आहेत. परळी, माजलगाव, भोकरदन, जाफराबाद तसेच पुणे येथे यापूर्वी बैठका पार पडल्या असून सर्वत्र ठेवीदारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. बीड येथील बैठकीतही मोठ्या संख्येने शासनाचे लक्ष वेधले जाईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# चार शतकानंतरही प्रत्येक मनावर अधिराज्य गाजवणारे व्यक्तिमत्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज –अंबादास रोकडे



माजलगाव दि.२१ (प्रतिनिधी):- नेताजी सुभाष चंद्र बोस प्राथमिक व माध्यमिक विद्यालय तसेच इंदिरा व मंगलनाथ बालकाश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव अति उत्साहात साजरा झाला. भगव्या पताकांनी, झेंडयांनी, ढोल, लेझीम च्या गजरात रांगोळ्यांनी सजलेल्या विद्यालयात भगव्या शिव लहरींचे आगमन होऊन अगदी सगळ्यात परिसरच जणू शिवाजीमय झाला होता. नृत्यातून, पोवाड्यातुन नाटकांतून, भाषणातून, मान्यवरांनी, पदाधिकाऱ्यांनी, शिक्षक कर्मचाऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी शिव जयंती उत्सवानिमित्त इतिहासाची उजळणी केली. या भारावलेल्या वातावरणात कार्यक्रमाची शोभा वाढविणारे प्रमुख अतिथी म्हणून सिद्धेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. अंबादास रोकडे, शिक्षिका अनुराधा खुर्पे यांची उपस्थिती होती तर संस्था संचालिका संध्या देशमुख बालगृह अधीक्षक राजेश सुरवसे मुख्याध्यापक नवनाथ कदम या मान्यवरांनी व विद्यार्थ्यांना आपल्या मनोगत मधून शिवाजी महाराज कसे घडले ? आणि इतिहास कसा घडला याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. सूत्रसंचालन श्रीमती चौरे यांनी केले तर पाळण्यातल्या खऱ्याखुऱ्या बाल शिवाजीचा देखावा सादर करण्यासाठी तसेच एकँदर कार्यक्रमा साठी शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग, विद्यार्थ्यांची या कार्यक्रमासाठी मेहनत व उत्स्फूर्त सहभाग दिसून आला .

पान ६ वरून

## के.एस.पी.विद्यालय येथे छत्रपती

खुप गोड शब्दात सादर केले. तसेच उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी मुलांना महाराजाच्या जीवनकार्या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख ऋषिकेश शेळके, अंजली शेळके, शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## प्रितम शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय खो–खो स्पर्धा उत्साहात

उपस्थित होते. प्रास्ताविकपर मनोगतात लालाजी जाधव यांनी प्रतिवर्षी या स्पर्धाचे आयोजन करण्याचा शब्द दिला. तर अध्यक्षीय समारोपात डॉ. दत्ताजी नलावडे यांनी सहभागी व विजेत्या संघांना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक रुपये ३०००, द्वितीय पारितोषिक २०००, तर तृतीय पारितोषिक ११०० रु. मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. बक्षीस वितरण सोहळ्याच्या शेवटी, उपस्थित मान्यवर आणि खेळाडूंच्या समवेत केक कापून प्रितमजी शिंदे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक घोडके सर, वाघ सर, हांगे सर, भोसले सर, मा. केशव माटे, बाबासाहेब पवार, राजेंद्र पवार, राजेश्वर जाधव, केशव धिगे, पवन घाडगे, विजयकुमार इंगळे, गोवर्धनजी दराडे, दिपक सुरवसे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## कर्कश सायलेन्सरमुळे विद्यार्थिनींमध्ये दहशत

आहे. दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक शैलेश पवार यांनी अशा प्रकारांना पोलिस प्रशासन मुळीच सहन करणार नाही, परीक्षा काळात जर कोणी रोड रोमिओगिरी करताना आढळले तर त्यांना तात्काळ धडा शिकवून पोलिसी भाषेत त्यांचा बंदोबस्त केला जाईल, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

## आ.धस यांच्या मागणीनंतर ‘मिशन जरेवाडी’ आढावा मोहिमेला वेग

‘मिशन जरेवाडी’ची अंमलबजावणी पुन्हा प्रभावीपणे रुळावर आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती.त्याच अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी हनुमंत गव्हाणे यांनी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे दौरे सुरू केले असून ‘मिशन जरेवाडी’ व ‘निपुण भारत’ अंतर्गत अध्यापन कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेतला जात आहे. एक महिन्याच्या आत संपूर्ण स्थितीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व शिक्षकांना पॅटर्नची सुसंगत अंमलबजावणी करता यावी यासाठी लवकरच विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याची तयारी सुरू आहे. ‘मिशन जरेवाडी’ हा केवळ उपक्रम नसून पाटोदा तालुक्याच्या शैक्षणिक उन्नतीचा पाया आहे; गुणवत्तावाढीत कोणतीही तडजोड होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका आ.सुरेश धस यांनी बैठकीत मांडली होती. त्यांच्या या मागणीनंतर प्रशासन सक्रिय झाल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.

## आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे अफुची शेती

साठवणुक, वाहतुक बावत काहीएक माहिती मिळाल्यास वरील क्रमांकावर किवा सपोनि रत्नाकर घोळवे (एनडीपीएस कक्ष प्रमुख) मोक्र.८८८८८२४१०० यावर कळविण्यात यावे, आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल.

## माजलगावात लॉजमध्ये तरूणाचा मृतदेह

नाही. त्यामुळे संशय आल्याने शुक्रवारी रात्री याबाबतीत कर्मचाऱ्यांने सदरील व्यक्ती बाबत पोलिसांना माहिती दिली. असे कळते. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## वाहतुकीचे नियम पाळले तर मृत्यूचे प्रमाण घटेल –डिवायएसपी पांडकर

निश्चितपणे रस्ते अपघातात प्राण जाणाऱ्यांची संख्या कमी होईल. विद्यार्थ्यांनी परवाना असल्याशिवाय वाहन चालवू नये. जे दुचाकी चा वापर करतात त्यांनी हेल्मेटचा व चार चाकी धारकांनी सीट बेल्टचा वापर करावा. रस्त्यावरून जाताना आपल्यासमोर एखादा अपघात घडला तर आपण अपघात ग्रस्तांची मदत करावी. विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये रस्ते वाहतुकीच्या नियमांची जागृती व्हावी हा रस्ता सुरक्षा अभियानाचा उद्देश आहे. यावेळी शहर पोलीस उपाधीक्षक पूजा पवार ,भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी राहुल कुमार, गृह विभागाचे पोलीस उपाधीक्षक उमाशंकर कस्तुरे, पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक पांडुरंग दलाई, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता अक्षय गव्हाणे ,सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरज पवार, रोटरी क्लबचे अध्यक्ष राहुल बोरा, बीड गुड्स ट्रान्सपोर्ट संघटनेचे कोषाध्यक्ष दिलीप वांगीकर व त्यांचे सहकारी, शालेय रिक्षा युनियनचे अध्यक्ष बाबुभाई व त्यांचे सहकारी, पगारिया ऑटो प्रायव्हेट लिमिटेड चे जनरल मॅनेजर दिलीप भाटिया, सहाय्यक व्यवस्थापक हर्ष साळवी आदी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व विजय जाधवर यांनी केले. रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धा चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा व घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. चंपावती विद्यालय भगवान विद्यालय व शिवाजी विद्यालय या शाळेतील एनसीसी पथकाचे व चंपावती विद्यालयाच्या स्काऊट गाईडचे शिस्तबद्ध संचलन सादर झाले. समारोपाच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी तर आभार प्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंत विद्यालयाचे शिक्षक गाडेकर के. बी. व शेळके एम.बी.यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या सर्व अंमलदारांनी परिश्रम घेतले.

## बीड पं.स.मधील शिक्षण विभागाचा अजब कारभार

समोर आलेल्या माहितीनुसार याहीपेक्षा दूरभाग्याची बाब म्हणजे शिक्षण विभाग फक्त एवढ्यावर न थांबता या पथकातील आदेशात जे ग्रामसेवक सेवानिवृत्त झालेले आहेत, कार्यरत नाहीत किंवा ज्या ग्रामसेवकांनी स्वेच्छेने सेवानिवृत्ती घेतलेली आहे अशाही ग्रामसेवकांचे आदेश काढण्यात आलेले आहेत. यावरून असे दिसून येत आहे की दहावी व बारावी च्या परीक्षा संदर्भात शिक्षण विभाग व गटशिक्षण अधिकारी यांना कसलेली गांभीर्य नसून फक्त वरीष्ठाकडून आलेला कागद न वाचता पुढे ढकलायचा असे यांचा विभाग काम करताना दिसत आहे.यावरून पुन्हा एकदा शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ समोर येऊन याची पंचायत समिती बीड सर्वत्र चर्चेला उधान आले आहे.

## माजलगावच्या शिवाजीनगरमध्ये पंढरी

सप्ताहामध्ये कीर्तन शिव महापुराण कथा श्रावणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान शिवाजीनगर महिला भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुष्कर येथे वेदमूर्ती अथर्व जोशी यांचे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे

करण्यासाठी विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, पूज्य स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज तसेच रामदेव महाराज यांच्या हस्ते वेदमूर्ती अथर्व जोशी यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे, संयमशील साधनेचे आणि वैदिक परंपरेबद्दलच्या समर्पणाचे विशेष कौतुक केले.दरम्यान, पुष्करक्षेत्रात त्यांच्या आगमनावेळी घनपारायणाचा प्रारंभिक मंत्रोच्चार करून त्यांचे स्वागत करण्यात आले. वेदमूर्ती संतोष दुशी, गजानन जोतकर, घनश्याम महाराज, जीवन गुरुजी आदी विद्वान व मान्यवरांनी त्यांचा विशेष सत्कार केला. या वेळी उपस्थित भाविक व वेदप्रेमींनी वैदिक परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी अशा कार्यांची गरज अधोरेखित केली. वेदमूर्ती अथर्व जोशी हे बीड जिल्ह्याचे भूषण मानले जात असून त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्याची कीर्ती उंचावली आहे. आजच्या आधुनिक युगात वैदिक परंपरेचे सातत्य राखणे ही मोठी जबाबदारी असताना, त्यांनी घनपारायणासारखे कठीण व्रत पूर्ण करून नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या कार्यामुळे वैदिक अध्ययनाबद्दल समाजात नवचैतन्य निर्माण होईल, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## सासरच्या लोकांकडून त्रासाला कंटाळून विवाहितेची गळफास लावून आत्महत्या

म्हणून टोमणे मारून मानसिक छळ करत होते. दरम्यान, नात आम्रपाली आजारी असताना उपचारासाठी पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. गरिबीमुळे बापु कांबळे यांनी दोन-तीन हजार रुपये पाठवले, मात्र पूर्ण पैसे का दिले नाहीत यावरून अजयने भाग्यश्रीला मारून टाकण्याची धमकी दिली होती. या जाचाला कंटाळून भाग्यश्रीने १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास राहत्या घरासमोरील सीताफळीच्या झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेची माहिती मिळताच मुलीच्या माहेरच्यांनी अंबाजोगाईत धाव घेतली. मुलीच्या मृत्यूस पती अजय तुकाराम चौरे, सासू अयोध्या तुकाराम चौरे आणि सासरे तुकाराम चौरे हे जबाबदार असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ११५(२), ३(५), ३५१(२) आणि ३५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविकुमार राजेंद्र पवार करत आहेत.

पान १ वरून

## एसटीचे अर्धे तिकीट, फुकट प्रवास बंद होणार

परंतु आता हे आधार कार्ड देखील चालणार नाही कारण सरकारने नवीन कार्ड लागू केले आहे. नव्या कार्डला एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) असं म्हटले आहे. हे कार्ड देशभरातील कुठल्याही सरकारी वाहनांमधून प्रवासासाठी अनिवार्य करण्यात आलं आहे. त्यामुळे जर हे कार्ड प्रवाशांकडे असेल तरच त्याला अर्धे तिकीट, मोफत प्रवास व इतर सवलतींच्या योजनांचा लाभ घेता येणार आहे. अन्यथा पूर्ण तिकीट काढून प्रवास करावा लागणार आहे. १ मार्च २०२६ पासून हे कार्ड लागू होणार आहे. एनसीएमसी कार्ड हे ४ मार्च २०१९ रोजीच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते लाँच करण्यात आलं होतं आता ते महाराष्ट्रात बंधनकारक करण्यात आलं आहे.

## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर विद्यमान सरपंचच होणार प्रशासक

आलेल्या विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून संधी द्यावी, अशी ठाम भूमिका सरपंच परिषदेकडून मांडण्यात आली होती. यासाठी राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच न्यायालयीन स्तरावरही लढा देण्यात आला.

दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य शासनाने काढलेल्या राजपत्रानुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून कामकाज पाहण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच ग्रामपंचायत सदस्यांना प्रशासकीय समिती म्हणून अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे गाव पातळीवरील विकासकामांना गती मिळणार असून, प्रशासकीय अडथळे दूर होणार आहेत.

या निर्णयामुळे अनुभवी आणि गावच्या परिस्थितीची पूर्ण माहिती असलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून गावाचा कारभार अधिक प्रभावीपणे चालणार आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांऐवजी लोकनियुक्त प्रतिनिधींनाच जबाबदारी दिल्याने लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण झाले असून, गावांचा विकास अखंडितपणे सुरू राहणार असल्याचा विश्वास सरपंच परिषदेकडून व्यक्त करण्यात आला आहे.या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच सरपंचांच्या मागणीला पाठिंबा देणारे आ. श्रीकांत भारतीय, आ.सुरेश धस यांच्यासह राज्यातील ४० आमदारांचे सरपंच परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले आहेत.

सरपंचांच्या न्याय्य मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य सरकारने लोकशाहीचा सन्मान राखला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. या ऐतिहासिक निर्णयाच्या स्वागतासाठी राज्यातील विविध भागांत सरपंच व पदाधिकाऱ्यांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात येत असून, मिठाई वाटप व अभिनंदन सोहळ्यांद्वारे सरकारचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

या निर्णयामुळे महाराष्ट्रातील ग्रामपंचायत व्यवस्थेला स्थैर्य मिळणार असून, ग्रामीण विकासाच्या कामांना नवे बळ मिळणार असल्याचे मत ग्रामपंचायत पदाधिकारी व सरपंच परिषदेकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## मौलाना आझाद महामंडळाची शैक्षणिक कर्जमर्यादा २० लाखापर्यंत

अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे, आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले यांच्यासह अल्पसंख्यांक सचिव जयवंश रुचेश यांच्याकडे केली होती. त्यावेळी बैठकीत चर्चाही झाली. मंडळामध्ये ती मंजूरही करण्यात आली. चार दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्यांक मंत्री सुनेत्राताई पवार यांनी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये महाराष्ट्र शासनाकडून दिले जाणारे ५ लाखांच्या कर्जाची २० लाखांपर्यंत वाढ केली. या निर्णयाचे स्वागत करत संचालक शेख तय्यब यांनी सुनेत्राताई अजितदादा पवार यांचे आभार मानले.

शैक्षणिक शुल्कात सातत्याने वाढ होत असल्याने पूर्वीची कर्ज मर्यादा अपुरी पडत असल्याची बाब लक्षात घेऊन संचालक शेख तय्यब यांनी अध्यक्ष आणि सचिव यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून कर्ज मर्यादा वाढवण्याची ठोस मागणी केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत अध्यक्ष मुश्ताक अंतुले तसेच राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी सकारात्मक भूमिका घेत आढावा बैठकीत कर्ज मर्यादा वाढवण्याचा निर्णय जाहीर केला.

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या आढावा बैठकीत विविध योजनांचा सखोल आढावा घेण्यात आला. राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी शासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ठरवून दिलेल्या धोरणांनुसार विभागाची वाटचाल सुरू असल्याचे नमूद करण्यात आले. या बैठकीत डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना अंतर्गत पायाभूत सुविधा अनुदान २ लाखांवरून १० लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचाही निर्णय घेण्यात आला. तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात येणारी वसतिगृहे तातडीने पूर्ण करण्याचे, अल्पसंख्यांक बहुल भागांतील विकासकामांना गती देण्याचे आणि विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. याशिवाय वक्फ मंडळ, वक्फ न्यायाधिकरण आणि हज समितीतील रिक्त पदे तातडीने भरण्याचे आदेश देण्यात आले असून अल्पसंख्यांक समाजातील तरुणांना रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवण्यावर भर देण्यात येणार आहे.

दरम्यान, संचालक शेख तय्यब यांनी ही प्रमुख मागणी लावून धरली होती. आढावा बैठकीत सुनेत्राताई पवार यांनी मागणी मंजूर करत विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिल्यानंतर मंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, संचालक शेख तय्यब यांच्यासह मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे सर्व संचालकांनी ताईंचे आभार मानले.

## शिवसेना पदाधिकाऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र गळ्यातील दोर तुटल्याने ते खाली कोसळल्याने गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. दरम्यान गळफास घेण्यापुर्वी देवकते यांनी लिहिलेली चिठ्ठी आढळली असून त्यामध्ये सर्व माझ्या जीवाभावाच्या मित्रांना व माझ्या शिवसेनेतील सर्व मित्र कंपनीला शेवटचा जय महाराष्ट्र असा उल्लेख आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, ढेकणमोहाचे सरपंच व ग्रामसेवक यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून मी आत्महत्या करत आहेत. त्यांनी मला मानसिक त्रास दिला त्यासाठी त्यांना दोषी ठरविण्यात यावे अशी विनंती देखील देवकते यांनी चिठ्ठीत लिहिल्याचे दिसून येत आहे. या घटनेने खळबळ उडाली असून घटनास्थळी पोलिसांनी भेट देऊन घटनेची माहिती घेतली आहे. देवकते यांनी चिठ्ठीत लिहिलेल्या आरोपांची पडताळणी केली जात असून तपासानंतरच सत्य समोर येईल असे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ पान -३


## परीक्षेच्या सीसीटीव्ही फुटेजचे जतन करा!

मुंबई दि. २१ (प्रतिनिधी):- राज्यात दहावी व बारावीच्या परीक्षा पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळाने कडक नियमावली लागू केली आहे. याअंतर्गत सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवणे आणि त्याचे रेकॉर्डिंग जतन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या संदर्भात विभागीय मंडळाने क्षेत्रीय अधिकारी, केंद्रसंचालक, मुख्याध्यापक आणि प्राचार्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

## इराणची उलटी गिनती सुरु!

नवी दिल्ली दि. २१ :- : इराणशी वाढत्या तणावादरम्यान अमेरिकेने मोठे पाउल उचलले आहे. अमेरिकेचे एअर फोर्स सर्वात शक्तिशाली बंकर बस्टर बॉम्ब पुन्हा खरेदी करणार आहे. यामुळे इराणची झोप उडाली आहे. यामुळे दोन्ही देशातील तणाव अधिक वाढण्याची शक्यता आहे.नुकतेच अमेरिकेने इराणवरील हल्ला पुढे ढकलल्याची माहिती समोर आली आहे. परंतु अमेरिकेच्या या लष्करी पावलाने मात्र मोठ्या युद्धाचे संकेत दिले आहेत. पण मिळालेल्या माहितीनुसार, अमेरिकेने बोईंग कँपनीसोबत १०० दशलक्ष डॉलर्सचा मोठा संरक्षण करार केला असून हा करार अंतिम टप्प्यात आहे. लवकरच बंकर बस्टर बॉम्ब अमेरिकेच्या लष्करात सामील होण्याची शक्यता आहे.

## चौसाळा महाविद्यालयात माती परीक्षणबाबत कार्यशाळा संपन्न

चौसाळा दि २१ (प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील चौसाळा येथीलकला व विज्ञान महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार सेवा केंद्राच्या वतीने २० फेब्रुवारी रोजी माती परिक्षण एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सुधाकर वणवे व अध्यक्ष प्राचार्य डॉ.पंडित खाकरे समन्वयक डॉ. प्रशांत साबळे, डॉ. आलदे,डॉ.कदम प्रा. गणपती धवलशंख उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.वणवे यांनी माती पद्धत परीक्षणाचे महत्व व पाणी सेंद्रीय खत मातीची प्रतवारी यावर मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. खाकरे यांनी माती चे उत्पादन घटक म्हणून महत्व विषद केले. प्रास्ताविक डॉ. साबळे सुत्रसंचलन डॉ.आलदे तर आभार प्रदर्शन डॉ. विलास भिल्लारे यांनी मानले.यावेळी महाविद्यालयातील प्रबंद सादरीकरणमध्ये उत्कृष्ट पेपर लेखन पुरस्कार डॉ.मंजुषा रसाळ , आदर्श शिक्षक पुरस्कार प्रा.मनीषा गिराम , प्रा.अमजद शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# १ लाख रुपयाचा धनादेश वटला नाही म्हणून सुभाष शिंदे यास ६ महिने शिक्षा व दंड

बीड दि २१(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील मौजे करसुंडी येथील रहिवासी असलेल्या विष्णू भरत कूलगुडे यांच्याकडून याच गावातील पण स्वराज्य नगर बीड येथे राहत असलेल्या सुभाष शिंदे यांनी सहा महिन्यात परत करतो म्हणून एक लाख रुपये घेतले. त्या पोटी दिलेला धनादेश वटला नाही, पैसे मागून देखील मिळत नसल्याने शेवटी विष्णू कूलगुडे यांनी न्यायालयात खटला दाखल केला. तसे या खटल्याच्या सुनावणीत अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी बीड यांच्या कोटनि एक लाख रुपयाचा धनादेश वटला नाही म्हणून सुभाष शिंदे यास सहा महिन्याची शिक्षा व दंड ठोठावला.



ॲड.सागर नाईकवाडे

या संदर्भात माहिती अशी की करचडी येथील फिर्यादी विष्णू भरत कुलगुडे व आरोपी हे एकाच गावचे रहिवाशी असून उभयतांमध्ये मित्रत्त्वाचे, विश्वासाचे संबंध आहेत. आरोपी हा गंगाभारती महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.करचोंडी, चार चेअरमन/अध्यक्ष होता आरोपीच्या पतसंस्थेत आरोपीने मुदत ठेव करण्याकरीता फिर्यादीस विनंती केली.तसे फिर्यादीने आरोपीच्या पतसंस्थेमध्ये १३ मे २० २२ रोजी दोन लाखाची ठेव ठेवली त्यानंतर आरोपीने जुलै २०२३ घरगुती कारणासाठी फिर्यादी कडून एक लाख रुपये हात उसने घेतले व सहा महिन्यात परत करण्याचे सांगितले तसे फिर्यादीने जानेवारी २४ मध्ये पैसे परत मागितले असता आरोपीने त्याचे खाते असलेल्या श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप.बँक लि.बीड, शाखा -बार्शी रोड, बीड, येथील खाते असलेला एक लाख रुपयाचा धनादेश दिला . सदर धनादेश नमूद तारखेला वटला जाईल व फिर्यादीस रक्कम मिळून जाईल, असे आश्वासन आरोपीने फिर्यादीस दिले.असे की, फिर्यादीने धनादेश त्याचे खाते असलेल्या भारतीय स्टेट बॅक, शाखा- शिवाजी नगर, बीड बँकेत वाटण्यासाठी टाकला असता तो पटण्याइतके शिल्लक रक्कम नसल्याने वाटला नाही . याबद्दल फिर्यादीने आरोपीला प्रकार सांगितल्यानंतर उडवा उडवायचे उत्तरे दिले व पैसे देण्यास साफ नकार दिला पण आरोपीनेफिर्यादीस उडवा-उडवीची उत्तरे दिली व सदर धनादेशावरील रक्कम देण्यास साफ नकार दिला. त्यानंतर फिर्यादीने सदरचे धनादेश न वटता परत आल्यानंतर विधिज्ञा मार्फत फिर्यादीने आरोपीस आठ मार्च २०२४ रोजी सदरच्या धनादेशावरील रक्कम मागणीची वकीलामार्फत रजिस्टर नोटीस पाठवली तरीही रक्कम दिली नाही. त्यामुळे फिर्यादीने मुख्य न्यायदंडाधिकारी ,बीड येथे कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ऍक्ट अन्वये तक्रार दाखल केली . यावेळी सर्व कागदपत्राचे पुरावे देण्यात आले. सदर प्रकरणात आरोपीतर्फे सदर व्यवहार हा पूर्वीचा असल्याबाबत बचाव आरोपीने घेतला. युक्तिवादअंती फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन करून अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी बीअॅड. यांनी सर्व साक्षी पुराव्यांचे अवलोकन अवलोकन व फिर्यादीचे विधिज्ञ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य करून अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी आरोपीस सहा महिने शिक्षा व धनादेश रक्कम व दंड मिळून अशी एकूण १ लाख ५० हजार रुपये रक्कम फिर्यादीस देण्याचे आदेश केले. सदर प्रकरणात फिर्यादी तर्फे ॲड.सागर नाईकवाडे, यांनी काम पाहिले त्यांना ॲड.सुधीर जाधव, ॲड.सतीष गाडे, ॲड.राजेश जाधव, ॲड. विवेक डोके ॲड. कृष्णा आवारे, आकाश गायकवाड यांनी सहकार्य केले.

## शिवजयंतीनिमित्त आई तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठानच्या शिबिरात १०७ रक्तदात्यांचे रक्तदान

बीड दि २१ (प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'आई तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठान, बीड च्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये १०७ रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान शिवरायांना आगळीवेगळी मानवंदना दिली. सामाजिक बांधिलकीतून शिवजयंतीनिमित्त सकाळी नऊ वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सुरुवातीस मान्यवरांनी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन केले शिबिराचे आयोजन केले. तर यावेळी १०७ पिशव्या रक्त संकलित झाल्यामुळे रक्तपेढीच्या डॉक्टरांनी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी प्रतिष्ठानच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर स्वागत केले आहे.

# रमेशदादा आजबे यांनी कंपनीच्या टार्गेटचा आकडा ओलांडून दुप्पट ट्रॅक्टरची केली विक्री

आष्टी दि.२१(प्रतिनिधी):- शून्यातून विश्व निर्माण करून उद्योग जगतामध्ये गगन भरारी घेत शेकडो नागरिकांच्या हाताला काम मिळवून देणारे,स्वकर्तत्वावर आपले वेगळे स्थान निर्माण करणारे उद्योजक आयडॉल असणारे रमेश दादा आजबे पाटील यांच्या सावळेश्वर उद्योग समूहाचे आष्टी शहरातील सावळेश्वर ट्रॅक्टर्स या स्वराज कंपनीच्या भव्य ट्रॅक्टरचा शुभारंभ मागील वर्षी शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला होता. विशेष आकर्षक ग्राहकांना सवलत व तत्पर सेवा दिल्याने आष्टी तालुक्यात स्वराज ट्रॅक्टर ला मोठी मागणी वाढली अन जिकडे-तिकडे स्वराज ट्रॅक्टरच ग्राहकांनी खरेदी करण्यास पसंती दिल्याने सावळेश्वर ट्रॅक्टरने कंपनीने ठरवून दिलेल्या टार्गेटचा टप्पा ओलांडून दुप्पट ट्रॅक्टरचे विक्रमी विक्री करून गावागावात शोरूमचे व कंपनीचे नाव पोहोचले आहे. ग्राहक राजांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल सावळेश्वर ट्रॅक्टरचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी ग्राहकांचे आभार मानले पहिल्या वर्धापन दिन मेहनत घेणाऱ्या सर्व स्टाफ कर्मचाऱ्यांसोबत केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.




सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी आष्टी शहरात मागिल वर्षी १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टर चे नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न केला. कंपनीने विक्रीचे टार्गेट दिल्यानंतर सावळेश्वर ट्रॅक्टर वर्षभर भव्य बंफर ऑफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या १ वर्षात ४४४ स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.हा विक्रमी सेलचा टप्पा ओलांडण्यासाठी रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता , एरिया मॅनेजर गिरीश जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे, ब्रांच मॅनेजर मुळे ,मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळ,अकाउंट प्रांजली उगले,सुजाता सायकड, आशा पवार, रिसेप्शन रेणुका वैद्य, जयश्री सांगळे, लखन आजबे,आकाश शेळके,जालिंदर भवर, सागर निकरड,श्रीकांत गोले, ऋषी गायकवाड,रणजीत मुंडे, नामदेव आजबे,रवींद्र खंडागळे,ओमकार सोले, अशोक खंडागळे,धीरज रोडे,सुरज गोलेकर,स्वप्निल बरकडे,नामदेव हराळ,इब्राहिम पठाण, हनुमान घरगीणे, विश्वकर्मा कुमार,पुजा साठे,आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने ट्रॅक्टरचा विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे.आमच्या शोरुमच्या वर्धापनदिनानिमित्त सर्व प्रिय ग्राहक आणि हितचिंतकांचे मनापासून आभार मानत तुमचा अमूल्य विश्वास आणि पाठिंबा हाच आमच्या यशाचा आधार आहे. गेल्या वर्षांपासून तुमच्या सेवेसाठी तत्पर राहून, तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत. असे रमेश दादा आजबे यांनी यावेळी नमूद केले.

# शिवजयंतीचे औचित्य साधून बीड बस आगारात एनसीएमसी स्मार्ट कार्ड' नोंदणीचा थाटात शुभारंभ

बीड दि.२१(प्रतिनिधी):- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून १९ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड आगारात प्रवासी सेवेच्या आधुनिकीकरणाचा नवा टप्पा गाठण्यात आला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ( एम एस आर टी सी) आणि 'Ebix Cash' यांच्या संयुक्त विद्यमाने एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) प्रोजेक्ट अंतर्गत स्मार्ट कार्ड नोंदणीचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला.



### मान्यवरांची उपस्थिती

या प्रसंगी बीड विभागाचे विभागीय वाहतूक अधिकारी राजकुमारजी दिवटे आणि विभागीय वाहतूक अधीक्षक शिवराजजी कराड यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला आगार व्यवस्थापक सतीश तिडके, स्थानक प्रमुख भिमकिरण बनसोडे, वाहतूक निरीक्षक श्रीमती ज्योती नागरगोजे, वाहतूक निरीक्षक गणेश जगताप उपस्थित होते. 'Ebix Cash' कंपनीच्या वतीने प्रतिनिधी श्याम टकले, हर्षवर्धन जाधव आणि राहुल जाधव यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले.

### योजनांची वैशिष्ट्ये आणि प्रथम कार्डांचे वाटप

या कार्यक्रमात महामंडळाच्या दोन महत्त्वाच्या योजनांतर्गत प्रथम कार्डांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महिला सन्मान योजना या योजनेंतर्गत राज्यातील सर्व महिलांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये तिकीट दरात ५०% सवलत दिली जाते. बीड आगारात या योजनेचे प्रथम स्मार्ट कार्ड आशा मोहनराव गोरे यांची नोंदणी करून गौरविण्यात आले.तर अमृत ज्येष्ठ नागरिक योजना: ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या सर्व सेवांमधून मोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली आहे. या योजनेचे प्रथम स्मार्ट कार्ड बापूराव नागोडकर यांची नोंदणी करण्यात आली. शिवाय या विशेष प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आणि प्रवाशांना सुलभ नोंदणी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी बीड आगारात वैभव मोहनराव गोरे यांची 'अधिकृत प्रतिनिधी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.तरी बीड आगारातील सर्व महिला, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांनी या डिजिटल क्रांतीमध्ये सहभागी होऊन आपली नोंदणी आगारात असलेल्या प्रतिनिधींकडे त्वरित करावी, असे आवाहन आगार व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

## के.एस.पी.विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

बीड दि २१ (प्रतिनिधी)- शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करुन शाळेच्या परिसरातुन रॅली काढण्यात आली. मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभुषा तर मुलींनी पारंपारिक वेशभुषा धारण केली होती. छोटया चिमुकल्याच्या रॅलीमुळे सर्व परिसर दुमदुमला होता. सर्वांनी मुलांचे खुप कौतुक केले. यावेळी मुलांनी महाराजा विषयी आपले मनोगत खुप गोड शब्दात सादर केले. तसेच उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी मुलांना महाराजाच्या जीवनकार्या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख ऋषिकेश शेळके, अंजली शेळके, शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जैन कॉन्फरन्स व कोठारी प्रतिष्ठानतर्फे जामखेडमध्ये शिवजयंती उत्साहात

जामखेड दि.२१ (प्रतिनिधी):- शहरात जैन कॉन्फरन्स आणि कोठारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. धनंजय भोसले सर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी शिवचरित्रातील पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी राज्यकारभार यावर सविस्तर प्रकाश टाकला. त तसेच जैन कॉन्फरन्स व कोठारी प्रतिष्ठानतर्फे विविध महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथी सातत्याने साजऱ्या केल्या जातात, ही समाजप्रबोधनाची अत्यंत स्तुत्य परंपरा असल्याचे नमूद केले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य संजय कोठारी यांनी आपल्या भाषणात शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी राज्याची वैशिष्ट्ये सांगितली. यावेळी संजय कोठारी यांच्या समाजसेवेचाही कार्यक्रमात गौरव करण्यात आला. कार्यक्रमास कोठारी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष कांतीलाल कोठारी, साखर सम्राट अशोक चोरडिया, राहुल राखेचा, अरुण लटके, शिवम चव्हाण तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मोहम्मद आहिल काजी याने पहिला रोजा पूर्ण केला

केज दि. २१ (प्रतिनिधी) पवित्र रमजान महिन्यात श्रद्धा, संयम आणि सबुरीचे विशेष महत्त्व आहे. केज येथील साडे सहा वर्षांच्या मोहम्मद आहिल नदिम काजी याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) पूर्ण केल्याने त्याचा सर्वत्र कौतुक होत आहे. मोहम्मद आहिल काजी याने पहाटेच्या सहेरी पासून संध्याकाळच्या इफ्तार पर्यंत पूर्ण दिवस रोजा पाळला. दिवसभर आनंदी चेहऱ्याने आणि कोणतीही तक्रार न करता त्याने हा रोजा पूर्ण केला. त्याच्या जिद्दीचे आणि श्रद्धेचे परिसरात, मित्र परिवारात कौतुक होत आहे. कुटुंबियानी सांगितले की, मोहम्मद आहिल ने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्याच्या उत्साहामुळे आणि चिकाटीमुळे आम्हाला ही आनंद व अभिमान वाटतो. रमजान महिन्यात लहान मुलांमध्ये धार्मिक संस्कार, शिस्त आणि संयम यांची जपणूक व्हावी यासाठी मोहम्मद आहिलचा हा पहिला रोजा प्रेरणादायी ठरत आहे.



# चिखला गावातील मारहाणीच्या घटने बाबत लिंबागणेश येथे निदर्शने करून केला निषेध

लिंबागणेश दि.२१ (प्रतिनिधी):- शिवस्मारक उभारणीच्या वादातून मराठा समाजातील बांधव व महिलांवर दगडफेक करत अमानुष मारहाण करण्यात आल्याची घटना बुलढाणा जिल्ह्यातील चिखला गावात घडली. या घटनेचा बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे निदर्शने करत निषेध करण्यात आला असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते डॉ .गणेश ढवळे यांनी प्रसिद्धी पत्रकातून कळवली

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या उभारणीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या घटनेत संजीवनी वाघ यांच्यासह अन्य महिलांवर हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. स्त्रीसन्मान व न्यायाची शिकवण देणाऱ्या शिवरायांच्या विचारांना ही घटना काळीमा फासणारी असल्याची भावना व्यक्त करून घटनेचा निषेध करण्यात आला उपस्थित त्यांनी यावेळी निदर्शने केली. निदर्शनादरम्यान राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी निवेदन पाठवून प्रशासनाने निष्पक्ष व तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, कल्याण वाणी, बाळकृष्ण थोरात, भगवान मोरे, ॲड. गणेश वाणी, दामोदर थोरात, महादेव कुदळे, विक्रांत वाणी, सर्पमित्र अशोक जाधव, अशोकराजे वाणी, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, नाना वाणी,महावीर जाधव, अक्षय नाईकवाडे, संजय पावले, रामदास मुळे, केशव गिरे, गहिनीनाथ वाणी, राजेभाऊ पाटील, रामा वाणी, भगवान लगास आदी उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात शिवजयंती साजरी

बीड दि.२१ (प्रतिनिधी)- शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज जयंती मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात झाले. या प्रसंगी यु.बी.पवळ यांनी आपले विचार प्रतिपादन केले. या प्रसंगी मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, आदर्श राज्यकर्ता या विषयी विद्यार्थ्यांनी व्यापक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख यु.बी.पवळ यांनी प्रास्ताविक श्रीम.एन.जी.मुंडे आणि आभार डब्ल्यु.एस.वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर.बी. घुले आणि सय्यद सर यांनी प्रयत्न केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

# माजलगाव वकील संघात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

माजलगाव दि.२१(प्रतिनिधी):- येथील माजलगाव वकील संघात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी सदर जयंती कार्यक्रमात ॲड.बि.एस.घनघाव यांनी यांनी शिवाजी महाराजांच्या विषयी गीत गायले तसेच ॲड. एस.डब्लू.साळवे यांची मुलगी सृष्टी तिने देखील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील मनोगत व्यक्त केले.तसेच बलराज शिंदे यांनी देखील शिवाजी महाराजांचे विचार मांडले सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपाध्यक्ष जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन वकील संघाचे अध्यक्ष ॲड.एस.एम.सिद्दीकी यांनी मानले तर कार्यक्रम यशस्वी करण्यास वकील संघाचे सचिव ॲड.नारायण तेलगड यांनी मेहनत घेतली.सदरील कार्यक्रमास सिनियर ड,एस.के.गोंडे, ॲड.एस.ए. सुतळे, ॲड.टि.एन.कोल्हे, ॲड.आर.यु.पायाळ, ॲड.एम. टि.देशपांडे, ॲड.के.एन.डोंगरे, नाईकवाडे, ॲड.साबळे, ॲड.गरड, ॲड शिंदे, ॲड.खेत्री, ॲड.आडे, ॲड.मुंढे, ॲड.तेरकर, ॲड.मोरे, ॲड.तिडके यांच्यासाह वकील संघातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बीड बसस्थानकात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसवा -वीर

बीड दि २१ (प्रतिनिधी):- येत्या दहा दिवसांमध्ये शहरातील बस स्थानकात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसवा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शाम वीर यांनी दिला आहे.

बीड बस स्थानकामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसवण्यात यावी अशी मागणी गत अनेक दिवसापासून करण्यात येत आहे. मात्र एसटी महामंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत येणाऱ्या दहा दिवसात संबंधित अधिकाऱ्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा नाही बसवली तर स्वतः आम्ही महामंडळात अण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा बसून व आंदोलनही करण्यात येईल असा इशारा शामवीर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# संपादकीय

## संशयाचं धुकं

विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याची माहिती आल्याने या प्रकरणाच्या चर्चेत आणखी वाढ झाली. तथ्य किती किंवा शक्यता किती याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही. अजितदादांच्या अपघाती निधनाने सामान्य माणूस अजूनही बुचकळ्यात आहे. एखाद्या अनपेक्षित घटनेचा धक्का एवढा मोठा असतो, की घटना घडून गेल्यानंतरही बरेच दिवस ती घटना मनाला स्वीकारता येत नाही. सत्य कळत असतं, पण त्यावर विश्वास ठेवायला मन तयार नसतं. एका बाजूला अनपेक्षित, अविश्वसनीय घटना आणि त्यानंतर समाज माध्यमांवरून फिरत असलेल्या अजितदादांच्या अनेक चित्रफिती. त्यात भर आमदार रोहित पवार यांच्याकडून व्यक्त होत असलेल्या संशयाची. अपघात हे खरं तर अतार्किकच असतात. त्यामुळे, तर्काने त्यात अनेक प्रश्न उपस्थित होतच असतात. काही सर्वसामान्यांच्या मनात असलेले प्रश्न, काही तज्ज्ञांचे प्रश्न, आपल्याकडे प्रत्येक व्यवस्थेत असलेल्या अव्यवस्था आणि नेमक्या त्याच दिवशी घडलेल्या काही अपवादात्मक त्रुटी या सगळ्यांची गोळाबेरीज रोहित यांच्या प्रश्न आणि संशयात असल्याने त्या अपघाताभोवतीचं गूढ वाढत चाललं आहे. रोहित यांच्या आरोपवजा प्रश्नांना सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रवक्ते आनंद परांजपे यांनी उत्तरं दिली. पण, तरीही रोहित यांच्या पत्रकार परिषदा थांबेनात आणि त्यांच्या समर्थनार्थ अजितदादांचे धाकटे चिरंजीव जय पवारही आले, तेव्हां राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तरं द्यायला सुरुवात केली. रोहित यांच्या नेमक्या प्रश्नांना खरे तर हवाई वाहतूक विभागाशी संबंधित यंत्रणांनी उत्तर द्यायला हवं होतं किंवा निदान तज्ज्ञांचे अहवाल येईपर्यंत वाट बघण्याचं आवाहन तरी करायला हवं होतं. पण, विमान ज्या खासगी कंपनीचं होतं, त्या कंपनीने आपल्या बाजूने अजून तरी कोणतीच वस्तुस्थिती उघड न केल्याने आणि हवाई प्रवासी वाहतूक विभागाशी संबंधित नियंत्रक संस्थांनीही अजून तपासातील प्रगती अधिकृतरीत्या जनतेसमोर न ठेवल्याने रोहित यांच्या प्रश्नांची धार वाढत चालली आहे. सर्वसामान्य माणसालाही त्यामुळे काही प्रश्न पडू लागले आहेत. अजितदादांच्या अपघाती निधनानंतर त्याविषयी पहिली शंका व्यक्त केली, ती पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी. ममता यांचा संशय पसरू नये आणि या दुःखद घटनेला वेगळं वळण लागू नये, तो राजकारणाचा विषय होऊ नये, यासाठी शरद पवार यांनी तातडीने माध्यमांसमोर येऊन खुलासा केला. पण, त्यानंतर ही जबाबदारी खुद्द त्यांचे नातू रोहित यांनीच घेतली! राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते, आमदार अमोल मिटकरी ही या अपघाताबाबत प्रश्न उपस्थित करणारी दुसरी राजकीय व्यक्ती होती. ममतादीदींनी विषय नंतर सोडून दिला. मिटकरीही फार बोलले नाहीत. पण, रोहित या संदर्भातील तांत्रिक व परिस्थितीजन्य माहिती गोळा करू लागले. खासगी गुप्तहेरांमार्फतही काही माहिती गोळा करणार असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केलं. मुंबई आणि दिल्लीत त्यांनी माध्यमांसमोर सादरीकरणही केलं आणि त्याला धरून रोज काही ना काही मुद्दे मांडत राहिले. त्यामुळे संशयाचं वादळ मनामनांत घोंघावतं आहे. घराघरांत त्याची चर्चा सुरू आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याचं सांगितलं गेल्याने अविश्वासात भर पडली आहे. तथ्य किती किंवा तथ्याच्या शक्यता किती, याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रत्येकाच्या डोक्यातील प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही. रोहित पवार आणि अजितदादांचं कुटुंब तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळ्या पक्षात आहेत. रोहित आणि अजितदादांच्या पक्षातील 'अन्य' नेत्यांचा राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावरही दादांच्या मृत्यूनंतर वाद झाला होता. त्यामुळे, रोहित यांच्या या आरोपांनाही त्या नेत्यांकडून त्याच पद्धतीने उत्तरं दिली जातील, असं वाटत असतानाच एके दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या पार्थ पवार आणि पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्या. त्यांनी या अपघाताची सीबीआय या केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली. अजितदादांनंतर सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री असताना, संपूर्ण पक्ष सत्ताधारी महायुतीत सहभागी असताना आणि फडणवीस यांच्यासोबत एकूण एक पक्षाचे मधुर संबंध असताना अचानक ही मागणी का व्हावी? रोहित यांना रोखण्यासाठी, पक्षांतील खदखद थांबवण्यासाठी, की हितचिंतक मतदारांना दिलासा देण्यासाठी? फडणवीस यांचा दिल्ली दौरा ठरला होताच. त्यामुळे, त्यांनीही या शिष्टमंडळाला 'माझी केंद्रीय गृहमंत्र्यांबरोबर भेट होणार आहे. आपली मागणी मी त्यांच्यापर्यंत नक्की पोहोचवतो' असं आश्वासन दिलं. पुढे काय? ते थोड्याच दिवसांत कळेल. राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकलं झाल्यापासून या दोन्ही पक्षातले संबंध त्या पक्षांच्या सर्वोच्च नेत्यांतील भावनिक संबंधांवर हेलकावे खात होते. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाचा विषयही त्याचाच भाग होता. आपल्याबरोबरच्या नेत्यांचं काहीही मत असलं, तरी पक्षाच्या अगदी खालच्या थरातील कार्यकर्त्यांच्या आणि मतदाराच्या मनात काय आहे, याची कल्पना अजितदादांना होती. १२ फेब्रुवारीचा मुहूर्त त्यांनी म्हणूनच नक्की केला होता. महानगरपालिकेच्या निवडणुकीतील प्रचारसभांत ते या एकत्रिकरणाबद्दल उपस्थित जनसमुदायाला आश्वासित करत असत. त्याचे अनेक व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर भरपूर फिरताहेत. राजकारण्यांसाठी राजकीय सोय सर्वाधिक महत्त्वाची असते. ते साहजिकही आहे. राष्ट्रवादीचे दोन भाग झाले, ते या सोयीसाठी आणि आता त्या पक्षाचे वरिष्ठ नेते एकत्रिकरणाच्या विचारापासून पक्षाला शक्य तितक्या लांब घेऊन जाऊ पाहताहेत, तेही त्यासाठीच. अपघाताबद्दलचे प्रश्न आणि त्याच्या चौकशीच्या मागण्या या सोयी - गैरसोयीचा भाग होऊ नयेत, एवढीच घराघरांतल्या सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असेल.

# केज तालुक्यातील २३ ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्याने १३ प्रशासकांची नियुक्ती

केज (प्रतिनिधी) केज तालुक्यातील ११४ ग्रामपंचायती पैकी २३ ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्यांचा कार्यकाळ दि. १६ फेब्रुवारी रोजी पूर्ण झाल्यामुळे या २३ ग्रामपंचायतीवर १३ प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामूळे इच्छुकांना आता ग्रामपंचायतनिवडणुकीचे वेध लागले आहेत. त्यामूळे आता निवडणुका कधी होणार ? याकडे गाव पातळीवरील पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे. यापूर्वी झालेल्या ग्रामपंचायती च्या सरपंचपदाची निवड ही सदस्यांतून करण्यात आली होती. त्यामुळे सरपंच आणि उपसरपंच हे दोन्ही एका गटाचे झाले होते. परंतु आता सरपंच पदाची निवड थेट जनतेतून होणार असल्या मूळे अनेक गावचे पुढारी सरपंच होण्यासाठी गुढग्याला बाशिंग बांधून बसले आहेत.

प्रभाग रचनेच्या प्रक्रियेस या महिन्यात २७ तारखे पासून सुरुवात होणार असून ४मे पर्यंत प्रभाग रचनेची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेसाठी आणखीकाही महिन्यांचा अवधी शिल्लक असल्याने इच्छुक उमेदवारांना तयारीसाठी भरपूर वेळ मिळणार आहे. सरपंच पदाचे आरक्षण अगोदरच सुटल्यामुळे व अनेक ग्रामपंचायतीचे सरपंच पद हे महिलांसाठी आरक्षित राहिल्यामुळे सरपंच पदासाठी इच्छुक असलेल्याना पुन्हा संधी मिळणार नसल्याने त्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. तर ज्या २३ ग्रामपंचायतीचा कार्यकाल पूर्ण झाला आहे. त्या ग्रामपंचायती च्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाले असून, यात अनुसूचित जाती महिलासाठी मोटेगाव, लाखा, अनुसूचित जमाती धोतरा, इतर मागा वर्गीयांचा प्रवर्ग पैठण, दरडवाडी, काशीदवाडी,थांचा प्रवर्ग पैठण, दरडवाडी, काशीदवाडी,गप्पेवाडी, भोपला, शिंदी, इतर मागास वर्गीयांचा प्रवर्ग महिलाः बोबडेवाडी, येवता, रामेश्वरवाडी, पाथरा, सर्वसाधारण : आंधळेवाडी, जाधव जवळा, घाटेवाडी, नारेवाडी, कोरडेवाडी. सर्वसाधारण महिला : मुंडेवाडी, विडा, सुकळी, बानेगाव, वाघेबाभूळगाव या ग्रामपंचायतीचा समावेश आहे. या ग्रामपंचायतींचा कार्यकाल संपला. २०२१ मध्ये निवडणुका झालेल्या केज तालुक्यातील बोबडेवाडी मुंडेवाडी, आंधळेवाडी, पैठण, विडा/गौरवाडी, येवता, धोतरा, दरडवाडी, जाधवजवळा, काशिदवाडी, सुकळी, बानेगाव, रामेश्वरवाडी, ढाकणवाडी, घाटेवाडी, गप्पेवाडी/ नामेवाडी, वाघेबाभुळगाव, नारेवाडी, पाथरा, भोपला, मोटेगाव, लाखा, कोरडेवाडी, शिंदी या २३ ग्रामपंचायतीचा कार्यकाल १६ फेब्रुवारी रोजी संपला आहे.

२३ ग्राम पंचायतीवर १३ प्रशासक, मुदत संपलेल्या २३ ग्रामपंचायतीवर १३ प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली असून सून, यात कृषी अधिकारी भाऊसाहेब राठोड बोबडेवाडी, कृषी अधिकारी ए. ए. डाके मुंडेवाडी, आंधळेवाडी, विस्तारअधिकारी ए.व्ही. चौरे पैठण, विस्तार अधिकारी आर.एच. राठोड विडा/गौरवाडी, येवता, विस्तार अधिकारी व्ही. एम. मस्के धोतरा, दरडवाडी, बानेगाव, विस्तार अधिकारी व्ही.एल. कदम जाधव जवळा, काशिदवाडी, एस. एम. जहागीरदार सुकळी, एस.बी.करंजवणकर रामेश्वरवाडी ढाकणवाडी, बी. के. गायकवाड घाटेवाडी, गप्पेवाडी/ नामेवाडी, जे.एम. भूतपल्ले वाधे बाभुळगाव, नारेवाडी, शाखा अभियंता ए.एस. पटेल पाथरा, भोपला, शाखा अभियंता एस.डी. हातागळे मोटेगाव, लाखा, शाखा अभियंता एस. के. वीर कोरडेवाडी, शिंदी यांचा समावेश आहे.

## पत्रकार इमादोद्दीन इमानदार यांना कंत्राटदाराकडून जीवे मारण्याची धमकी

बीड दि २१(प्रतिनिधी)-बीड जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या जुन्या इमारतीच्या कामाचे अंदाजपत्रक मागितल्याच्या कारणावरून एका खासगी कंत्राटदाराने पत्रकाराला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना २०२० फेब्रुवारी रोजी दुपारी घडली. या प्रकरणी संबंधित कंत्राटदाराविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

'दैनिक लोक इच्छा'चे संपादक इमादोद्दीन इस्तीयाकोद्दीन इमानदार (वय ३४, रा. झमझम कॉलनी, बीड) हे २० फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे ४:४६ वाजता एसपी ऑफिस समोरील जोशी हॉटेलमध्ये होते. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या जुन्या इमारतीचे काम करणारे खासगी कंत्राटदार मसुराम कदम (रा. इमामपूर, ता. जि. बीड) यांना बातमीच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी फोन केला.पत्रकार म्हणून कामाचे इस्टीमेट मागितल्यावर कंत्राटदार मसुराम कदम यांनी तुम्ही कुठले पत्रकार? इस्टीमेट तुम्हीच तयार करून घ्या, असे उद्धटपणे उत्तर दिले. त्यानंतर त्यांनी फोनवर अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.या प्रकारानंतर इमादोद्दीन इमानदार यांनी तात्काळ पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यांच्या जबाबावरून कंत्राटदार मसुराम कदम यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३५१ (४) अन्वये अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## निवडीबद्दल निलेश कुमार गव्हाणेचा पारगाव ग्रामस्थांनी केला सत्कार

बीड दि २१(प्रतिनिधी)- निलेश कुमार बाबासाहेब गव्हाणे यांची तालुका कृषी अधिकारी वर्ग दोन पदी निवड झाल्याने त्याचा २१ फेब्रुवारी रोजी पारगांव सिरस येथे भव्य नागरी सत्कार संपन्न झाला . गावकऱ्याच्या वतीने वाजत गाजत गावामध्ये भव्य मिरवणूक काढण्यात आली महिलांनी औक्षण करून आपल्या भूमिपुत्राचा शाळेच्या व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाला पारगाव सिरसच्या सरपंच सौ जानकाताई दिनकर जमदाडे व राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाउपाध्यक्ष श्रीकांत नाना नवले यांनी भूमिपुत्राचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार केला.यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक उदमुले सर यांनी प्रास्ताविक भाषण केले यावेळेस सौ ठोंबरे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास वाघमारे सर, बबन खोड , अशोक नवले टेलर, पिराजी बहीर, उबाळे, ठोंबरे सर, रावसाहेब गव्हाणे सर, श्रीहरी गव्हाणे, युवा नेते दत्ता काशीद, रंगनाथ गव्हाणे, दुकानदार हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

## ईगलवूड पॉलीटेक्निक इन्स्टिट्यूट च्या ५४ विद्यार्थ्यांना टाटा ऑटो पंप गोषण ग्रीन एनर्जी कंपनीत नोकरीची संधी

माजलगाव (प्रतिनिधी):- येथील ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्लेसमेंट क्षेत्रात लक्षणीय यश मिळवत अंतिम वर्षातील ५४ विद्यार्थ्यांची टाटा ऑटोकोम्प गोशन ग्रीन एनर्जी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड या आघाडीच्या कंपनीमध्ये निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा दर्जा अधोरेखित झाला आहे.संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या पुढाकाराने कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी या भरती प्रक्रियेत सहभाग घेतला. वैयक्तिक मुलाखतींच्या टप्प्यांतून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार, सचिव डॉ. शरद पवार आणि कोषाध्यक्ष डॉ. सुशील लोढा यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या परिश्रमांचे कौतुक केले. उद्योगाभिमुख शिक्षण, प्रात्यक्षिकांवर आधारित प्रशिक्षण आणि अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाले आहे, असे त्यांनी सांगितले.प्राचार्य प्रतिक वेळापुरे आणि टीपीओ ऋतुजा वेळापुरे मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, संस्थेत राबविण्यात येणारे सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, औद्योगिक भेटी आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम यांचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला आहे.इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) बॅटरी व हरित ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कंपनीत काम करण्याची संधी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची पायरी ठरणार आहे. या यशामुळे ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने प्लेसमेंट क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

## संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



बीड दि २१(प्रतिनिधी)- संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये शिवाजी महाराजयांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक परजणे सर व विभाग प्रमुख कटारिया मॅम उपस्थित होते. कार्यक्रमास मिसेस कल्पना देव मॅडम यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. अध्यक्ष, विभाग प्रमुख आणि प्रमुख पाहुणे यांनी प्रतिमेस हार घालून पूजन केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या भाषणांनी कार्यक्रमाचे सुरुवात झाली. यावेळी कल्पना देव मॅडम यांनी शिवाजी महाराज यांच्या कार्या विषयी थोडक्यात माहिती मुलांना सांगितली . त्यानंतर काही मुलांनी भाषणे दिली, काही मुलांनी पोवाडा गायला तर काहींनी शिवाजी महाराजांवर गाणी गायली कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे इयत्ता तिसरी मधील विद्यार्थिनींनी शिवाजी महाराजांचा पाळणा अतिशय सुंदररित्या सर्वांसमोर गाऊन परफॉर्म केला . इयत्ता आठवी मधील गौरव यादव याने मिस्टर पाठक सर यांच्या मार्गदर्शना खाली भित्तिपत्रक सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिसेस निमगावकर मॅडम यांनी अतिशय सुंदर रित्या पार पाडले . कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मिसेस ठक्कर मॅडम यांनी केले. अशाप्रकारे संपूर्ण कार्यक्रम सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख मिसेस प्रीती पाटील यांनी मुख्याध्यापक परजणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व शिक्षक व शिक्षकेतर यांच्या साथीने यशस्वी पार पाडला.

## मरणोत्तर मोक्षापेक्षा जिवंतपणी आनंदासाठी हरिनाम हाच सोपा मार्ग-श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर

माजलगाव दि २१(प्रतिनिधी)-माजलगाव येथील राजस्थानी मंगल कार्यालयात धुंडा महाराज प्रतिष्ठान, माजलगाव आणि राजस्थानी सेवा समाज संघ, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'माऊलीचा हरिपाठ - अभंग पाचवा' या विषयावर श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांची १८,१९,२० रोजी तीन दिवसीय प्रवचनमाला उत्साहात संपन्न झाली. समारोप प्रसंगी बोलताना महाराजांनी मरणोत्तर मोक्ष मिळण्याची अपेक्षा ठेवण्यापेक्षा जिवंतपणी आनंद मिळवायचा असेल तर हरिनामाशिवाय दुसरा सोपा मार्ग नाही, असे प्रतिपादन केले.



समारोपीय सत्राच्या प्रारंभी नादमय पोरे यांच्या अभंग गायनाने भक्तिमय वातावरणाची निर्मिती झाली. आकाश देशमुख व प्राणेश पोरे यांनी तबला व हार्मोनियमवर सुरेख संगत केली. त्यानंतर गुरूंच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. पुढे मान्यवरांच्या हस्ते गुरूंना माळ्यार्पण करण्यात आले. यावेळी बोलताना श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, यज्ञ-याग, कठीण तपश्चर्या किंवा दुरापास्त साधना करून ईश्वरप्राप्तीच्या मागे धावण्यापेक्षा ज्ञानेश्वर माऊलींनी हरिपाठातून सांगितलेले सहज, सोपे तत्वज्ञान आचरणात आणणे अधिक महत्त्वाचे आहे. 'हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा' हा केवळ उच्चार नसून तो जीवनाचा श्वास आहे. मेल्यानंतर स्वर्ग मिळेल की मोक्ष प्राप्त होईल यापेक्षा आजच्या क्षणी मनाला आनंद, समाधान आणि ईश्वरस्मरण लाभणे अधिक आवश्यक आहे. हरिनामाच्या जपातून मन शुद्ध होते, विचार पवित्र होतात आणि आयुष्याला दिशा मिळते. क्षणभर जरी आपण ईश्वराच्या सानिध्यात गेलो तरी तेच खरे धन आहे. म्हणून प्रत्येकाने हरिनामाचा जप करून जीवनात आनंदाची अनुभूती घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.तीन दिवसीय या प्रवचनमालेचे सूत्रसंचालन सौ. स्मिता लिमगाव कर यांनी केले. दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्यासह प्रतिष्ठानचे अध्यक्ष मधुकरराव वैद्य, लक्ष्मण लक्ष्मीकांत मोताळे, गोपीकिशनजी इंदानी, राधेश्याम लोहिया, रंगनाथ सावंत, विजय लवूळकर आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.सौ. वेदश्री स्वप्निल भानप, कुमारी श्रेया डोंगे व ऋषिकेश बादाडे यांच्या पसायदानाने प्रवचनमालेची भक्तिमय वातावरणात सांगता झाली.या प्रवचनमालेस छत्रपती संभाजीनगर, परभणी, बीड, सेलू, अंबाजोगाई आदी शहरांमधून तसेच माजलगाव शहर व परिसरातून भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. तीन दिवस हरिनामाच्या गजरात रंगलेली ही प्रवचनमाला भक्तांच्या मनात आध्यात्मिक ऊर्जा जागवून गेली.

## भारती बांगर इंटरनॅशनल स्कूल या शाळेत विविध सांस्कृतिक उपक्रमांनी शिवजयंती साजरी

गेवराई दि.२१ (प्रतिनिधी) :- भारती बांगर इंटरनॅशनल स्कूल या शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संपूर्ण शाळा परिसर शिवमय वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रमाची सुरूवात महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर दिमाखदार सादरीकरण करत आकर्षक शोभायात्रा काढली. या मिरवणूकीत विद्यार्थ्यांनी संत तुकाराम महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज तसेच शिवकालीन मावळे व वारकरी संप्रदायाची वेशभूषा साकारत इतिहासाची जिवंत झलक सादर केली. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणामुळे संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते. शाळेचे शिक्षक भारती सर व विकास नरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली लेझीम पथकाने उत्कृष्ट व तालबद्ध सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास शाळेचे



प्राचार्य प्रमोदकुमार भुक्तार, उपप्राचार्य दत्ता भोसले तसेच प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वर राक्षे सर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित प्रेरणादायी भाषणे सादर केली तसेच जोशपूर्ण पोवाडयांचेही सादरीकरण केले. विद्यार्थिनी कु.प्रीतम ढाकणे व आरोही मडकर यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. अशा प्रकारे इतिहासाची प्रेरणा आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम घडवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास शाळेचे विद्यार्थी, शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्याची लेक झाली कृषि उपसंचालक

नवगण राजुरी दि.२१ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील काकडहिरा येथील अशोक बागलाने या शेतकर्याची मुलगी आणि सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालयाची विद्यार्थीनी रेणूका बागलाने एम.पी.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण होऊन कृषि उपसंचालक झाली. तिच्या या निवडीबद्दल माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.रेणूका अशोक बागलाने या विद्यार्थीनिने इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण जि.प. प्रशाला काकडहिरा येथे तर माध्यमिक शिक्षण गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवगण राजुरी येथे पूर्ण करून कृषि पदवीचे शिक्षण सौ. के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालय येथे पूर्ण केले त्यानंतर एम.एस्सी. अॅग्री आणि पी.एच.डी. कृषि विद्यापीठ, राहुरी येथे पूर्ण करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेतून कृषि उपसंचालक (वर्ग १ पदी) तिची निवड झाली. ती सुरवातीपसूनच अभ्यासात हुशार होती, तीने जिद्दीने स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून कृषि क्षेत्रात उच्च पद मिळविण्याचे ध्येय ठेवले होते. तिच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि मार्गदशनावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. काकडहिरा या खेडयागावातून प्रथमच कृषि उपसंचालक वर्ग १ पदी निवड झाल्याने गावकर्यांच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला तसेच राज्याचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी रेणूका बागलाने यांची कृषि उपसंचालक वर्ग १ पदी निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करून तिला महाविंद्यालयाच्या वतीने रोख पारितोषीक देण्यात आले. यावेळी दिनकर कदम, विलास बडगे, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ.अरूण भस्मे, अनंत कृषि विकास प्रतिष्ठाणचे सहसचिव गोविंदराव साळूंके, सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोरे एस.पी., अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सय्यद झेड.एच., कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य पोकळे एस.बी., प्रा.डॉ. शिंदे, एस.टी., प्रा.डॉ. तागड व्ही.बी., संदिपान जाधव, हनुमान धावडे आदि उपस्थित होते.

## मांजरा धरणाची ८६ कोटीची पाणी पट्टी थकली

केज दि २१ (प्रतिनिधी) - बीड जिल्ह्यात प्रमुख असलेल्या तालुक्यातील धनेगाव येथील मश मांजरा धरणातून लातुर, बीड आणि धाराशिव या तीन जिल्ह्यातील एकूण २२ पाणीपुरवठा योजनेला पाणीपुरवठा केला जातो. आज मितीस मांजरा धरणावरील २२ पाणी पुरवठा योजनांकडे ८६ कोटी, ६ लाख २३ हजार ७५५ रुपये एवढी पाणी पट्टीची थकबाकी असल्याचे सांगत पाणीपट्टी वसुलीसाठी नोटीसा पाठवल्याचे अभियंता नीतनवरे यांनी माध्यमांना सांगितले.बीड आणि धाराशिव जिल्ह्याच्या सिमेवरून वाहणाऱ्या मांजरा नदी वर उभारण्यात आलेल्या मांजरा धरणातून बीड जिल्ह्यातील ९, धाराशिव जिल्ह्यातील ७ आणि लातुर जिल्ह्यातील ६ अशा एकूण २२ पाणी पुरवठा योजनांकडे ८६ कोटी ६ लाख २३ हजार ७५५ रुपयांची पाणी पट्टी थकबाकी आहे. बीड, धाराशिव व लातुर जिल्ह्यातील एकूण २२ थकबाकीदार पाणी पुरवठा योजना व संस्थांना आपल्याकडील थकबाकी दहा दिवसात भरण्या संबंधी लातुर येथील पाटबंधारे विभागाच्या वतीने नोटीस बजावण्यात आल्या असून वेळेत थकबाकीची रक्कम न भरणाऱ्या पाणीपुरवठा योजनांचा पाणी पुरवठा खंडित करण्यात येणार असल्याची माहिती पाटबंधारे विभागाचे सहाय्यक अभियंता अभिजित नितनवरे यांनी माध्यमांना बोलताना नमूद केली.पाणी साठा ८३ टक्के.बुधवारी सकाळी सहा वाजण्याच्या नोंदीनुसार ६४१.६६ मीटर एवढी पाणी पातळी आहे. १९३.९८४ दलघमी एकूण पाणी साठा आहे. तर ८२.९९टक्के धरण आज रोजी भरलेले आहे. त्यामूळे पुढील वर्षाअखेर पुरेल एवढा पाणी साठा आज रोजी मांजरा धरणात असल्याची माहिती माहिती मांजराचे शाखा अभियंता अनुप गिरी यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

# भाऊ कदम व रिंकू राजगुरू यांच्या उपस्थितीत आदर्शगाव वंजारवाडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज कार्यक्रम उत्साहात संपन्न







बीड दि.२१ (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विनोदी अभिनेते भाऊ कदम तसेच सैराट फेम अभिनेत्री रिंकू राजगुरू (आर्ची) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भाऊ कदम यांच्या खुमासदार व विनोदी भाषणाने उपस्थितांमध्ये हशा पिकला, तर रिंकू राजगुरू यांच्या संवादांनी वातावरण आनंदमय झाले.

आदर्शगाव वंजारवाडीचे सरपंच वैजिनाथ नाना तांदळे यांनी प्रस्ताविकामध्ये गावाच्या विकासकामांची सविस्तर माहिती दिली. यावेळी उपस्थितांणी टाळ्याच्या कडकडात स्वागत केले. सचिन सानप (विशेष कार्य अधिकारी, ग्रामविकास व पंचायतराज) यांनी योजनांविषयी सखोल मार्गदर्शन केले.

व्यासपीठावर किशोर काळे (उपमुख्य कार्यकारी अधिकारी), अनिरुद्धजी सानप (गटविकास अधिकारी), अजय चव्हाण तसेच इतर मान्यवर अधिकारी उपस्थित होते. तसेच परमेश्वर नाना तळेकर, संजय आंधळे, कैलास घुगे, अशोक दराडे, गोपाल बप्पा धांडे, सुनिल माने काका, हांगे साहेब, शिवाजी नागरगोजे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गावातील महिला व पुरुषांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सामाजिक कार्य सत्कार:श्री. लक्ष्मणराव पवार, शहादेव नाना तांदळे, पांडुरंग नाना राख, सोमिनाथ तांदळे सर, अध्यात्म कार्य सत्कार: संजय महाराज तांदळे, गोविंद महाराज तांदळे, आचन महाराज पवार, गजानन महाराज तांदळे, शरद महाराज झांझुर्णे

उमेद अभियान लखपती दिदी सत्कार: सौ.सुरेखा लहु घोडके, सौ.राधा अशोक काळे, सौ.मोनाली अरुण धुरंधरे, सौ.पल्लवी गणेश तांदळे, सौ.ललिता रावसाहेब कांबळे, सौ.दैवशाला तुकाराम झांझुर्णे

बागायतदार शेतकरी सत्कार: सुग्रिव विठोबा तांदळे, महादेव काशिनाथ कुटे, विठ्ठल रामभाऊ तांदळे, जालिंदर बापुराव शेंडगे, संजय राजाभाऊ खाडे, श्री. ज्ञानेश्वर मिठ्ठु मोराळे

भाऊ कदम व रिंकू राजगुरू यांच्या हस्ते सर्व सत्कारमूर्तींचा सन्मान करण्यात आला.

शेवटी ड.सर्जेराव तात्या तांदळे यांनी सर्वांचे आभार मानले. आदर्शगाव वंजारवाडी तसेच राजुरी नवगण परिसरातील नागरिक, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कार्यक्रम यशस्वी व संस्मरणीय ठरला.

## अभिनेत्री रिंकू राजगुरू यांची धारूर तालुक्यातील आवरगाव ग्रामपंचायतला भेट



किल्ले धारूर दि २१ (प्रतिनिधी) : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी धारूर तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत आवरगाव येथे 'सैराट' फेम प्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या आगमनानिमित्त ग्रामस्थांनी उत्साहात आणि जल्लोषात भव्य स्वागताची तयारी केली होती.

यावेळी त्यांच्या हस्ते वृक्षलागवड ,सेल्फी पॉईंटचे उद्घाटन तसेच महिला बचत गटाच्या फूड स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना प्रमाणपत्रांचे वितरण तसेच मधुमक्षिका पालन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना प्रशिक्षण प्रमाणपत्रांचे वितरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमाणपत्र स्वीकारताना लाभार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.गावातील विविध विकासकामांची पाहणी करत त्यांनी समाधान व्यक्त केले. आवरगावच्या स्वच्छता, नियोजनबद्ध कामे आणि ग्रामस्थांचा उत्साह पाहून त्या भारावून गेल्या. ''या आवरगाव गावाला कोणाचीही नजर लागू नये,'' अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त करत गावाच्या प्रगतीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास धारूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे, सहाय्यक गटविकास अधिकारी कांदे एस. एल., विस्तार अधिकारी बाबुराव राऊत, कक्ष अधिकारी शिंदे एस. एल.,लिपिक झुकते अनिल,अशोक खरसाडे, धारूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, धारूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, आवरगावचे आदर्श सरपंच अमोल सर्जेराव जगताप,आदर्श ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे, उपसरपंच नवनाथ नखाते, माजी सरपंच पद्मिनी जगताप, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व धारूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी सौ रोहिणी दळवे, देशमुख साहेब, वटाणे साहेब, दळवी साहेब, गायकवाड साहेब यांच्या सह अन्य ग्रामपंचायत अधिकारी तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श सरपंच अमोल सर्जेराव जगताप यांनी केले. सूत्रसंचालन शीतल अविनाश जगताप व अविनाश जगताप यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार आदर्श ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब झोंबाडे यांनी मानले.

## कवितेच्या आशयघन चिंतनातून कवींच्या लेखन भूमिके पर्यंत पोहोचता येते, शब्दघन चिंतनाने नव्हे - ह.भ.प.चैतन्य महाराज देगलुरकर


माजलगाव (प्रतिनिधी) : हरिपाठातील अभंग हे सुटे सुटे नाहीत , त्यांचा शृंखला युक्त परस्पर अनुबंध आहे , सिध्दी हा शब्द हरिपाठ व ज्ञानेंश्वरीत माउली नी अनेक वेळा भिन्नार्थांनी उपयोजित केला आहे. वंदनीय देगलुरकर महाराजांना ऐकणे म्हणजे '' आवर्तन चैतन्याच्या पुनर्भरणाचै '' हीच अनुभूती असते.

वेद , पुराण , उपनिषद, गाथा , काव्य शास्त्र , मराठी भाषेचे व्याकरण , भक्तिमय रंगाने नटलेले ,आध्यात्मिक , वैचारिक, वैज्ञानिक , सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक, संदर्भ चा अमृतकुंभ म्हणजे आद चैतन्य महाराजांचे प्रवचन होय. दीड दोन तासाच्या प्रवचनात , वर्तमानातील मिश्कील टिपणी करून महाराज श्रोत्यांना हसवतात ही. अमोघ अमृतवाणीत विशेष म्हणजे एक शब्द ही इतर भाषेचा नसतो. गेली अनेक वर्ष माजलगाव येथे '' प्रवचन माला '' सुरू आहे. पसायदान हा विषय पुर्ण करून मागील दोनतीन वर्षा पासुन हरिपाठ वरील विवेचन सुरू आहे. प्रती वर्षी हे तीन दिवस माजलगावतरा साठी '' चैतन्य '' दायी असतात. राजस्थानी मंगल कार्यालयात माजलगाव परिसरातील शिष्य गणासह अनेक मान्यवर दुरून दुरून येतात. खुपच सुरेख व लक्षवेधी असे नियोजन असते, दरवर्षी काही तरी नवे देण्याचा संयोजकांचा प्रयास असतो. या वर्षी सौ. वेदश्री भानप व श्रेया ठोंगे यांनी गुरूवर्य प्राणेश पोरे यांच्या मार्गदर्शनात सादर केलेले पसायदान खुप सुंदर होते. मा. मधुकर वैद्य , सुरेश भानप , रंगनाथ सावंत , राम देशपांडे , दिगंबर महाजन , रत्नाकर चौकिदार , बी. एस. देशपांडे , सौ स्मिता लिमगावकर .

## मुंबईत मराठी शाळांची दैना! तब्बल ५७ शाळा बंद पडण्याच्या वाटेवर

मुंबई : मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात सध्या मराठी राजभाषा दिनाचे पडघम वाजू लागले असताना मुंबई शहर व उपनगरांमधील मराठी माध्यमाच्या तब्बल ५७ शाळा बंद पडण्याच्या वाटेवर आहेत. मराठी शाळांच्या या ऱ्हासासाठी राज्य सरकारने १५ मार्च २०२४ रोजी घेतलेल्या संचमान्यतेचा निर्णय कारणीभूत असल्याचे समोर येत आहे.

मुंबई शहर व उपनगरात सर्व बोर्डांच्या मिळून १,७३६ शाळा आहेत. यापैकी सध्या सुरू असलेल्या मराठी शाळांची संख्या ३३७ आहे. सात वर्षांमध्ये मराठी शाळांचा आकडा ४६१वरून इतका रोडावला. यातील ८४ शाळा गेल्या वर्षातच बंद पडल्या. यात आता ५७ शाळांची भर पडण्याची शक्यता आहे. तसे झाले, तर मुंबईतील मराठी शाळांची संख्या २८०वर येईल. त्यामुळे मुंबई महाराष्ट्राला मिळावी, यासाठी एकेकाळी रक्त सांडणाऱ्या मराठी माणसांच्या मुंबईत मराठी शाळाच अल्पसंख्याक होणार आहेत.



गेवराई – पं.स.चे माजी उपसभापती तथा जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक डॉ.आसाराम मराठे यांचा आ.विजयसिंह पंडित यांनी वाढदिवसानिमित्त यथोचित सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## खर्डेवाडी येथे श्रीमद् भागवत कथा सोहळ्याला प्रारंभ

### कीर्तन, हरिपाठ व ग्रंथ भेट उपक्रमाचे आयोजन

बीड (प्रतिनिधी) : जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर बीज उत्सवानिमित्त तसेच किसनराव कळेकर आणि कै. रत्नदीप भागवत कळेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ खर्डेवाडी (ता. बीड) येथे गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासून श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचा शुभारंभ होत आहे.

नांदूर फाट्याजवळील खर्डेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तुकाराम बीज उत्सव मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने ह.भ.प. रामचंद्र महाराज जगताप (बीड) यांच्या वाणीतून श्रीमद् संगीत भागवत कथा निरूपण होणार आहे. दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत भागवत होईल. सोहळ्यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत खर्डेवाडी भजनी मंडळाचा हरिपाठ होणार आहे.

**त्रिदिनी किर्तन महोत्सव**

या श्रीमद् भागवत कथा सोहळ्याच्या निम्मित तीन दिवस कीर्तनाचे आयोजित करण्यात आले आहेत.यामध्ये ह भ प श्रीनिवास महाराज जगताप,पालसिंगण, ह भ प नारायण महाराज शिरसट आणि ह भ प केशवदास वैष्णव महाराज हिंगणी यांचे हरिकीर्तन होणार आहे या कीर्तनाला गावातील प्रतीक नागरिकांनी सौजन्य केले आहे .

**ग्रंथ भेट उपक्रम**

'ज्ञानोबा–तुकोबा आपल्या घरी' या उपक्रमांतर्गत ह.भ.प. हरिदास महाराज सोळंके आणि ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या संयोजनातून ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा या ग्रंथांची स्नेहभेट साधकांना देण्यात येणार आहे. भागवत कथा समाप्ती व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत ह.भ.प. राजन महाराज भोसले यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर कार्यक्रमाची सांगता होणार आहे. सात दिवस चालणाऱ्या या भागवत कथेचा श्रवणाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन आयोजक समस्त कळेकर परिवार,महादेव (नाना) साळुंके बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नॅनो टेक्नोलॉजीच्या सहाय्याने विज्ञानाच्या संशोधनात भारत उत्क्रांती करत आहे–प्रो.डॉ.भास्कर साठे

### सौ.के.एस.के.महाविद्यालयात रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन संपन्न

बीड (प्रतिनिधी) : येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने न्यू हॉरिझॉन इन केमिकल अँड फिजिकल सायन्सेस या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन प्रो. डॉ. भास्कर साठे रसायनशास्त्र विभाग तथा नॅनो टेक्नोलॉजी विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाड विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना त्यांनी रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व इतर शास्त्रातील संशोधनात नॅनो टेक्नोलॉजी च्या सहाय्याने भारत उत्क्रांती करत असून महत्वाचे संशोधनाचे कार्य संशोधकांच्या मदतीने आज होत असून मेडीकल फार्मास्युटिकल च्या माध्यमातून आपल्या देशात खुप मोठ्या प्रमाणात संशोधनात प्रगती करत असून त्याचा काही प्रमाणात पर्यावरणावर वाईट परीणाम होणार नाही याची काळजी घेतली पाहीजे. रसायनशास्त्रातील संशोधनामध्ये आजघडीला नवनवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण मानवाच्या शरीरातील हालचाली देखील कॅमेराच्या सहाय्याने सहज पाहु शकतो आणि त्यावर आवश्यक तेवढे उपचार देखील करु शकतो असे मत या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. या परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे यांनी ही परिषद रसायनशास्त्र व भौतिकशास्त्राच्या नव्या संशोधकांना उपयुक्त ठरणारी असून शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल. विज्ञानातील नवी क्षितीजे, नवतंत्रज्ञान, नवकल्पना यावर मंथन होईल. संशोधकांचे संशोधन वृत्तीला वाव मिळून हरीत तंत्रज्ञान ऊर्जा या संबंधाने या परिषदेत अभ्यासपुर्ण चर्चा होईल असे मत व्यक्त केले.

या परिषदेचे प्रमुख संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी या परिषदेच्या माध्यमातून महाविद्यालयातील विविध विभागातील संशोधन केंद्र व त्यात होणारे संशोधन कार्य महत्वपुर्ण होत असून महाविद्यालयातील विविध उपक्रमांचे संदर्भात महत्वपुर्ण माहिती दिली. प्रमुख अतिथी डॉ. हुसेनी, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए.एस. खान, परिषदेचे समन्वयक डॉ. सतिष माऊलगे, डॉ. अशोक डोंगरे, प्रा. रुपेश कोकाटे, डॉ. लक्ष्मण गाडेकर यांच्यासह सहभागी संशोधक प्राध्यापक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**जाहिर प्रगटन देणार :** सौ. सुवर्णा राहुल मिटकरी व सौ.सिमा सतिष मिटकरी
रा. जुना मोंढा बीड ता.जि.बीड. मो. नं. ९८८१३५०३५१

सर्व जनतेस कळविण्यात येते की, **सौ. संगिता ऋषिकेश ढास** यांच्या मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड स ब डिव. ता. बीड पैकी सावतामाळी चौक ता.जि. बीड येथील वार्ड क्र. २ ज्यास गट नं ७ नविन वाढीव नगर परिषद हद्दीचे अतिल सर्व्हे नं. १९५ तरफ खोड मालमत्ता क्र. २-९-५०९ असा मिळालेला आहे. त्यामधील १६.६१ X २१.५७ चौ. मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३४३.१९ चौ. मीटर एवढे आहे. सदर मिळकत त्यांच्या चतुः सिमा खाली नमुद करण्यात आलेल्या आहेत.

**१६.६१ X २१.५७ चौ. मीटर मिळकतीची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.**

**पूर्वस :** श्री. अरुण काळे, **पश्चिमेस :** ५० फुट पर्यंत भिमराव काळे यांचा प्लॉट व त्यानंतर १५ फुट रुंदीचा रस्ता. **दक्षिणेस :** ६ मीटर रूंदीचा रस्ता, **उत्तरेस :** सौ. मंजु संजय राऊत यांचा सुयोग ताराचंद कोटेचा यांनी खरेदी केलेला प्लॉट

येणे प्रमाणे वरील चतुः सिमेतील मिळकत प्रत्यक्ष ताबे वहिवाटीतील **सौ. संगिता ऋषिकेश ढास** यांच्या नावे असून सदर मिळकत त्यांची निर्विवाद असून, कर्जविरहित आहे. सदरील मिळकत आरक्षणाविरहित आहे. तसेच सदरील मिळकतीवर कुठल्याही सरकारी निमसरकारी अथवा खाजगी कर्ज बोजा नाही. निघाल्यास त्याची फेड करण्याची जबाबदारी सौ. संगिता ऋषिकेश ढास यांचेवर राहील. सदरील मिळकतीच्या व्यवहार मी तुमचेशिवाय इतर कोणाशीही केलेला नाही. तसेच मिळकत मी यापुर्वी कोणास दान, गहाण, तारण, बक्षीस, विक्री, भाडेपत्र, ईसारपावती, मुखत्यारपत्र या मार्गाने व इतर अन्य कुठल्याही मार्गाने हस्तांतरीत केलेली नाही किंवा तसा लेखी अथवा तोंडी करार देखील केलेला नाही. तसेच आढळून आल्यास त्यास मी जबाबदार राहील. त्याची तोषीस तुम्हास लागू देणार नाही. असा व्यवहार माझे सोबत झालेला आहे.

तरी कोणीही इसम भागीदारी फर्म, सदर मिळकती संबंधात सदर मिळकतीच्या चतुः सिमेतील रहिवाशी यापैकी कोणाचीही वरील मिळकतीवर व त्याच्या कोणत्याही भागावर खरेदी, गहाण, अदलाबदल, भाडेहक्क, कौटूंबिक व्यवस्था, बोजा, पट्टयाने वहिवाटीचे वारस, बक्षीस, विकसन, अधिकार, करार, करारनामा, तडजोड, ताबा, वहिवाटीचे अधिकार, न्यायालयाचे आदेश हुकूम इत्यादी वा ईतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी प्रस्तूतची नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी हरकत देवुन पोहच घ्यावी, अन्यथा वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क हितसंबंध नाही असे समजून वरील मिळकत निर्वावाद व निर्जाखमी असल्याचे ग्राहय धरून विक्रेत्याकडून कायदेशिर खरेदीखताव्दारे कायम खरेदी करण्यात येईल व मालक म्हणून **सौ. सुवर्णा राहुल मिटकरी व सौ. सिमा सतिष मिटकरी** हे पुढील व्यवहार पूर्ण करतील व पुढील कार्यवाहीस व वादास जबाबदार राहणार नाहीत.

सबब हे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.
ठिकाण :- बीड
दिनांक :- २१/०२/२०२६

जाहिर प्रगटन देणार
**सौ. सुवर्णा राहुल मिटकरी**
**व सौ. सिमा सतिष मिटकरी**
रा. जुना मोंढा बीड ता.जि. बीड

16564/13454



## जाहीर प्रगटन

आम जनतेस सुचित करण्यात येते की, आम्ही जाहीर प्रगटन देणार नामे **श्री.बापुराव पांडूरंग धांडे** रा. हॉटेल ग्रँड यशोदाच्या पाठीमागे, शिवाजीनगर, बीड ता.जि. बीड येथील रहिवासी असून यांच्या मालकीची मौजे शिवार बीड ता.जि.बीड येथील सर्व्हे नंबर १८१ तरफ बलगुजार मालमत्ता क्रमांक १-३-३१८४ व.स.क्र. १०४५/८/२०११ ही मालमत्ता बक्षीसपत्र म्हणून देण्यात आलेली आहे. सदर मालमत्ता ही हॉटेल मॅड यशोदा, बार्शी रोड, बीड च्या पाठीमागे आहे. सदर मालमत्तेसंदर्भात कसलाही व्यवहार जसे की, कोणताही ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, दानपत्र किंवा ईतर कोणत्याही मार्गाने व्यवहार करू नये.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद केलेल्या मालमतेसंदर्भात कोणत्याही व्यक्तींनी कसल्याही प्रकारचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये, नसता त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई व फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच याची सर्व जबाबदारी खरेदी करणाऱ्याची राहील.

करीता जाहीर प्रगटन देत आहोत.

बीड
दिनांक २१/०२/२०२६

जाहीर प्रगटन देणार
**श्री. बापुराव पांडूरंग धांडे**
रा. हॉटेल ग्रँड यशोदाच्या पाठीमागे,
शिवाजीनगर, बीड ता.जि.बीड
मो.नं. ९९६०९०००७९

16563



## दहावी पासची सनद हरवली आहे

**आदित्य किसन वंजारे**
राहणार बीड या नावाची आदर्श विद्यालय बीड इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा पासची सनद भक्ती कंट्रक्शन परिसरात हरवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क :** ७७१९०४९४ ४७

16562


## संस्कारमध्ये शिवजयंती निमित्त बालसभेचे आयोजन

बीड (प्रतिनिधी) : येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागामध्ये चिमुकल्यांनी शिवजयंती अतिशय उत्साहात साजरी केली. या निमित्ताने बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिवजी महाराजांचा पाळणा, पोवाडे, शिवरायांचे ध्येय,स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, अफजलखानाचा वध या प्रसंगावर आधारित आपले मनोगत व्यक्त करून, तसेच शिवरायांचे अनेक गीते सादर केली. त्यासोबतच अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सर्व शिक्षक वृंदांची मने जिंकून घेतली .या निमित्ताने व्यासपीठावर माननीय मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी व व विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर उपस्थित होत्या. तसेच बालसभेच्या अध्यक्षा म्हणून दुसरी क मधील कुमारी तनुश्री बनसोडे, तर प्रमुख पाहुण्या म्हणून कुमारी आरोही शिराळे व्यासपीठावर उपस्थित होत्या.

## शिवशारदा पब्लिक स्कूल या शाळेत शिवजयंती उत्साहात



गेवराई दि.२१ (प्रतिनिधी) : गेवराई तालुक्यातील शिवाजीनगर गढी येथील शिवशारदा पब्लिक स्कूल या शाळेत शनिवार दि.२१ फेब्रुवारी रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठया उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य संतोषकुमार अन्नम हे होते. यावेळी शैक्षणिक विभागप्रमुख इरफान तारेक शेख तसेच प्रशासकीय अधिकारी अनंत डावकर उपस्थित होते. प्राचार्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर सामूहिक आरती घेण्यात आली.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शिवचरित्रावर आधारित भित्तीपत्रकाचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले. केजी च्या विद्यार्थ्यांनी आकर्षक समूह नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या शौर्य, पराक्रम व स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणादायी कार्यावर आधारित देशभक्तीपर नृत्य सादर करत राष्ट्राभिमानाची भावना जागवली. इयत्ता ७ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी नाट्यप्रयोग सादर करून स्वराज्याच्या जाज्वल्य इतिहासाची उजळणी करून दिली. शाळेच्या कला शिक्षिका शीतल येवले व सोनाली नन्नवरे यांनी तांदळापासून साकारलेली छत्रपती शिवरायांची अप्रतिम प्रतिमा यावेळी विशेष आकर्षण ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवी वर्गातील प्रीती गोगुले व स्वराज तळणकर यांनी केले. इयत्ता ८ वी चे यश धुमक व अक्षरा धुमाळ तसेच इयत्ता ६ वी ची कृष्णाई खेत्रे हिने मराठी व इंग्रजी भाषेत प्रभावी भाषण सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी इयत्ता ७ वीचा श्लोक सारूक याने आभारप्रदर्शन केले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## प्रभाबाई केंद्रे यांचे निधन



केज दि.२१(प्रतिनिधी): तालुक्यातील होळ येथील प्रभाबाई सखाराम केंद्रे यांचे वृद्धपकाळाने शुक्रवारी (दि.२०) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्यावर होळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या भगवान युवा सेनेचे अध्यक्ष विजय केंद्रे यांच्या मातोश्री होत.


# पार्श्वभूमी

दि.२२ फेब्रुवारी २०२६ रविवार


## के.एस.पी.विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

बीड (प्रतिनिधी)–दि.१९फेब्रुवारी रोजी शहरातील के.एस.पी विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करुन शाळेच्या परिसरातुन रॅली काढण्यात आली. मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभुषा तर मुलींनी पारंपारिक वेशभुषा धारण केली होती. छोटया चिमुकल्याच्या रॅलीमुळे सर्व परिसर दुमदुमला होता. सर्वांनी मुलांचे खुप कौतुक केले. यावेळी मुलांनी महाराजा विषयी आपले मनोगत

पान २ वर



### कर्कश सायलेन्सरमुळे विद्यार्थिनींमध्ये दहशत

## परीक्षेच्या काळात ट्रिपल सीट 'रोड रोमिओ'चा धिंगाणा

पाटोदा दि.२१(प्रतिनिधी):- पाटोदा शहरात दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असताना वसंतदादा पाटील महाविद्यालय आणि जय भवानी महाविद्यालय परिसरात पेपर सुटल्यानंतर काही तरुणांकडून ट्रिपल सीट दुचाकींवरून भरधाव वेगात धिंगाणा घालण्याचे प्रकार वाढले आहेत. मोठ्या आवाजाचे सायलेन्सर, कर्णकर्कश हॉर्न आणि तोंडातून चित्र-विचित्र आवाज काढत मुख्य रस्त्यांवरून फेऱ्या मारल्या जात असल्याने विद्यार्थिनींसह नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महाविद्यालयाकडून शहराकडे येणाऱ्या तीव्र उताराच्या रस्त्यावर वेगाने वाहन चालविल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला असून सर्वसामान्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. २५ डिसेंबर रोजी झालेल्या आढावा बैठकीत आ.सुरेश धस यांनी कर्कश



सायलेन्सरधारक व ट्रिपल सीट दुचाकींवर कठोर कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या; मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली दिसत नसल्याची चर्चा आहे. परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विशेष मोहीम राबवून वेगमर्यादा उल्लंघन, ट्रिपल सीट प्रवास आणि कर्कश सायलेन्सरधारक वाहनांवर तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत

पान २ वर

## आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे अफुची शेती

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ; पाच लाख रूपये किंमतीचे २० किलो अफुचे झाडे जप्त

आष्टी दि २१(प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा बीड यांना गोपनिय माहिती मिळाल्यावरून स्थागुशा येथील पोउपनि महेश विघ्ने, पोह अशोक दुबाले, पोह गोविंद राख, पोअ बबन सलगर व चापोह सुनिल राठोड तसेच पोलीस ठाणे अंभोरा येथील पोउपनि भडके, पोउपनि तावरे, पो अ पैठणे असेंनी मिळून प्राप्त बातमीच्या ठिकाणी रात्री २१.३० वाजता छापा टाकला असता इसम नामे परसराम मोहन जगधने रा. पिंपळा ता. आष्टी जि.बीड याने त्याच्या ताब्यातील शेतातील कांद्याच्या पिकामध्ये अफुची बेकायदेशिर लागवड करून त्याचे संवर्धन व जोपासना करीत असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यतुन २० किलो वजनाची अफुची झाडे त्याला बोंडे व फुले असलेली, त्याची किमंत अंदाजे ५ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त करून सदर इसमाविरूध्द पोलीस ठाणे अंभोरा येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४६/२०२६ कलम ८ (ख), १५ एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोस्टे अंभोरा येथील अधिकारी करीत आहेत. सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक नविनत कॉवत,अप्पर पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर,उपविभागीय अधिकारी आष्टी हानपुडे पाटील, पोलीस निरीक्षक स्थागुशा बीड शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि महेश विघ्ने, पोलीस हवालदार अशोक दुवाले, गोविंद राख, बबन सलगर, सुनिल राठोड असेंनी व पोस्टे अंभोरा येथील पोउपनि भडके, पोउपनि तावरे, पोलीस हवालदार बांगर व पैठणे असेंनी मिळून केली आहे. तरी सर्व जनतेस बीड



जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आवाहन करण्यात येते की, पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन करण्यात आला असून त्याचा हेल्पलाईन क्रमांक ९२७०२४३२०० असा आहे. आपणास अंमली पदार्थ खरेदी, विक्री, उत्पादन,

पान २ वर

## माजलगावात लॉजमध्ये आढळला तरूणाचा मृतदेह

### शहरात खळबळ

माजलगाव दि.२१ (प्रतिनिधी): माजलगाव शहरातील बीड रोड या मुख्य रस्त्यावर असलेल्या व्यंकटेश लॉज मध्ये एका ४० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळला. ही घटना शुक्रवारी रात्री हॉटेल मॅनेजरच्या लक्षात आली असून माजलगाव शहर पोलीसात आकस्मित गुन्ह्याची नोंद करण्यात येत आहे. शहरातील मध्यवस्तीत असणाऱ्या व्यंकटेश या खासगी लॉजमध्ये मुक्कामासाठी थांबलेल्या चाळीस वर्षीय व्यक्तीचा मृतदेह शुक्रवारी रात्री आढळून आला. लॉज कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवसभर दरवाजा न उघडल्याने संशय आल्यावर दरवाजा उघडण्यात आला. त्यावेळी संबंधित व्यक्ती खोलीत निश्चेष्ट अवस्थेत आढळून आली. या घटनेची माहिती तत्काळ माजलगाव पोलीस ठाण्यात देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली यावेळी मरून पडलेल्या व्यक्तीजवळ असलेल्या आधार कार्ड



वरून सदरील मयत व्यक्ती श्रीकृष्ण प्रकाश डाके (वय ४०) रा. नित्रुड ता.माजलगाव येथील असल्याचे समजते. सदरील व्यक्तीने रविवार (दि.१५) रोजी लॉज मधिल रूम बुक केला असल्याची माहिती आहे. या दरम्यान लॉज कर्मचाऱ्याला लॉज मध्ये सतत दिसणारी व्यक्ती कालपासून रूम बाहेर दिसली

पान २ वर

### आ.धस यांच्या मागणीनंतर 'मिशन जरेवाडी' आढावा मोहिमेला वेग

## गटशिक्षणाधिकारी गव्हाणे यांच्याकडून ग्रामीण भागात शाळांचे तपासणी दौरे सुरू

पाटोदा दि.२१(महेश बेदरे):- पाटोदा तालुक्यातील प्राथमिक शिक्षणात परिवर्तन घडवणाऱ्या 'मिशन जरेवाडी' पॅटर्नच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आमदार सुरेश धस यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत ठोस मागणी केली होती. त्या मागणीनंतर शिक्षण विभागाने तालुक्यात 'मिशन जरेवाडी'चा सखोल आढावा घेण्यास सुरुवात केली असून प्राथमिक शाळांचे दौरे आणि अध्यापन कार्यपद्धतीची प्रत्यक्ष पडताळणी सुरू झाली आहे.जानेवारी २०२५ मध्ये सुरू झालेल्या या पॅटर्नने अल्पावधीतच उल्लेखनीय यश मिळवले होते. २३ पर्यवेक्षकांनी २३४ शाळा भेटी देत अध्यापनात सुधारणा घडवून आणली. 'निपुण भारत' अंतर्गत ४९० शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आणि एप्रिल २०२५ पर्यंत ७५०८ विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुमारे १० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. शिष्यवृत्ती परीक्षेत ३४ विद्यार्थी पात्र ठरले; जरेवाडीच्या दुर्गम शाळेतील २५ विद्यार्थ्यांनी यश संपादन करून तालुक्याचा लौकिक वाढवला.मात्र सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या १११ शिक्षक बदल्यांनंतर मागील काही कालावधीत गुणवत्तावाढीचा वेग मंदावल्याचे चित्र समोर आले. ही बाब गांभीर्याने घेत आ.सुरेश धस यांनी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान यांच्यासोबत झालेल्या बैठकीत

पान २ वर



### बीड पं.स.मधील शिक्षण विभागाचा अजब कारभार

## मयत ग्रामसेवकाची केली चक्क परीक्षेच्या बैठे पथकात नियुक्ती

बीड दि २१(प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यात दहावी व बारावी च्या परीक्षा सुरु असून या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सर्व परीक्षा केंद्रास सी सी कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. जेणेकरून परीक्षा मध्ये कसलाही सावळा गोंधळ होणार नाही.या परीक्षाची सर्व जिम्मेदारी हि शिक्षण विभागाची असते आणि याच पंचायत समिती बीड मधील शिक्षण विभागाचे गटशिक्षण अधिकारी समंदर खान यांनी उंटावरून शेळ्या राखण्याचे काम केले आहे. काल शिक्षण विभाग बीड कडून निघालेल्या बैठे पथक व भरारी पथकाच्या कर्मचारी नियुक्ती आदेशात या पथकात चक्क पाच वर्षापूर्वी मयत झालेले ग्रामसेवकाची बैठे पथकात नियुक्ती करून आदेश पारित करण्यात आला आहे.

पान २ वर

## वाहतुकीचे नियम पाळले तर मृत्यूचे प्रमाण घटेल -डिवायएसपी पांडकर

### जिल्हा वाहतूक शाखेच्या रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप संपन्न

बीड दि.२१(प्रतिनिधी):- विद्यार्थि आणी नागरीकानी रस्ता सुरक्षेचे नियम पाळले तर निश्चितच रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी होईल आणि त्यामुळे मृत्यूचे प्रमाणही घटेल असे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी जिल्हा वाहतूक शाखेच्या रस्ता सुरक्षा अभियान समारोपप्रसंगी बोलताना केले. जिल्हा वाहतूक शाखा बीड यांच्या वतीनेदि.१ते ३१जानेवारी दरम्यान जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा अभियानाचा समारोप २०फेब्रुवारी रोजी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर संपन्न झाला. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी सांगितले की रस्ते वाहतूक करताना रस्त्याच्या वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. यामुळे

पान २ वर



## माजलगावच्या शिवाजीनगरमध्ये पंढरी अवतरली अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व संगीत शिव महापुराण कथा सुरू

माजलगाव दि.२१( प्रतिनिधी) प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शिवाजीनगर महिला भजनी मंडळाच्या वतीने १८ फेब्रुवारी पासून अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण व ह भ प बालासाहेब नाईक महाराज यांच्या अमृत मयवाणीतून संगीत शिव महापुराण कथा सुरू असल्याने शिवाजीनगर मध्ये पंढरी अवतरल्याचे चित्र दिसत आहे.

शिवाजीनगर महिला भजनी मंडळाच्या वतीने गेल्या २१ वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला जात आहे त्याचप्रमाणे याही वर्षी दिनांक १८ फेब्रुवारी पासून या सप्ताहाची सुरुवात झाली आहे या सप्ताहामध्ये दररोज पहाटे चार ते सहा काकडा भजन सहा ते सात विष्णुसहस्त्रनाम सात ते साडेदहा ज्ञानेश्वरी पारायण साडेदहा ते दुपारी एक गाथा भजन दुपारी एक ते पाच संगीत शिव महापुराण कथा पाच ते सहा हरिपाठ आठ ते दहा हरिकीर्तन याचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक १८ फेब्रुवारी रोजी ह भ प सोमनाथ महाराज बदाले १९ फेब्रुवारी रोजी ह भ प सिताराम महाराज रोडगे, दिनांक २० फेब्रुवारी ह भ प एकनाथ महाराज माने दिनांक २१ फेब्रुवारी रोजी ह भ प ज्ञानेश्वर महाराज काकडे यांची कीर्तने झाली आहेत तर दिनांक २२ फेब्रुवारी रोजी ह भ प भागवत महाराज बादाडे दिनांक २३ फेब्रुवारी रोजी हभप पांडुरंग साळुंखे दिनांक २४ फेब्रुवारी रोजी ह भ प ज्ञानेश्वर माऊली करंजीकर आणि दिनांक २४ फेब्रुवारी रोजी रात्री दहा ते बारा महाराष्ट्रातील ख्यातनाम भारुडकार ह भ प विष्णु महाराज बांडे यांचा भारुडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे

दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते बारा ह भ प कीर्तनके श्री बाळकृष्ण गुरुकुल यांचे काल्याचे किर्तन होणार आहे तरी परिसरातील व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम

पान २ वर

## पुष्कर येथे वेदमूर्ती अथर्व जोशी यांचे शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे घनपारायण संपन्न

बीड दि.२१(प्रतिनिधी):- राजस्थानमधील पवित्र तीर्थक्षेत्र पुष्कर येथे वेदमूर्ती अथर्व जोशी यांनी शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे अत्यंत दुर्मिळ आणि कठीण असे वेदघनपारायण यशस्वीरीत्या पूर्ण करून वैदिक परंपरेचा मान उंचावला आहे. अत्यंत कठोर साधना, अचूक स्वरसंयोजन आणि परंपरेप्रती अखंड निष्ठा यांची कसोटी पाहणारे



हे घनपारायण मोजक्या वेदपाठींनाच साध्य होते. या उल्लेखनीय कार्यामुळे वैदिक अध्ययन-परंपरेत एक महत्त्वपूर्ण टप्पा नोंदवला गेला आहे. घनपारायण पूर्णत्वास गेल्यानंतर या कार्याचा गौरव

पान २ वर

## सासरच्या लोकांकडून त्रासाला कंटाळून विवाहितेची गळफास लावून आत्महत्या

### पती,सासू आणि सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी):-अंबाजोगाई जवळील चनई येथे सासरच्या लोकांकडून होणाऱ्या सततच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून एका विवाहितेने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मृताच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात पती, सासू आणि सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बापु पि.अर्जुन कांबळे (रा. डिसकळ, ता. कळंब, जि.धाराशीव) यांची मुलगी भाग्यश्री हिचे लग्न पाच वर्षांपूर्वी चनई येथील अजय तुकाराम चौरे याच्याशी झाले होते. लग्नानंतर काही काळ ठीक गेल्यानंतर पती अजय याला दारूचे व्यसन जडले. तो भाग्यश्रीला सतत मारहाण करत असे, तर सासू अयोध्या आणि सासरे तुकाराम हे तिला घरकाम येत नाही आणि तू संसार करू शकत नाहीस असे

पान २ वर

## बुध्दीबळ स्पर्धेत अश्विन दहिवाळने पटकावले विजेतेपद

बीड (प्रतिनिधी) गेवराई नगर पालिकेच्या गेवराई नगरपरिषद महोत्सव २०२६ अंतर्गत घेण्यात आलेल्या बुध्दीबळ स्पर्धेत विमला माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा विद्यार्थी अश्विन मच्छिंद्र दहिवाळ याने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून विजेतेपद पटकावले आहे.


## तृतीय पुण्यस्मरण



**कै.मधुकर श्रीधरराव रोटे**

तृतीय पुण्यस्मरण दि.२२/२/२०२६

तुमचं असणं सर्व काही होतं
आयुष्यातील एक ते सुंदर पर्व होतं
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे
पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे...

: स्मरणार्थी :

जानकीराम श्रीधरराव रोटे
दिपक मधुकर रोटे सोमेश सुनील रोटे
व समस्त रोटे परिवार नेकनूर

सुनील मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, बीड.
मो.क्र.९४२००३१०१५
श्री फुला अभ्यासिका, बीड.
गुरुगणेश आईस्क्रीम पार्लर, बीड.


### श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठानवर आज ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे कीर्तन

बीड दि.२१ (प्रतिनिधी):-येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान'वर शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ पासून सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे. या सप्ताहात भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.०० वाजत ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातेतकर व ह.भ.प. घुले महाराज यांचे प्रवचन तर रात्री सायंकाळी ६.३० ते ते ८.३० वेळात ह.भ प. महादेव महाराज चाकरवाडीकर, बाळनाथ संस्थान यांचे कीर्तन होणार आहे. कीर्तनानंतर दररोज महाप्रसाद होणार आहे.



## प्रितम शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा उत्साहात

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरात गेल्या १८ वर्षापासून सुरू असलेल्या मदर तेरेसा बालकाश्रम व महाराष्ट्र गुरुकुल परिषदेच्या वतीने बीडमध्ये जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा घेण्यात आल्या. निमित्त होते प्रितमजी शिंदे यांच्या वाढदिवसाचे. या जिल्हास्तरीय स्पर्धासाठी एकूण १६ संघांनी सहभाग नोंदवला. बीड शहरातील शाळा व निवासी प्रकल्पांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. सर्व सामने बाद फेरी प्रमाणे आयोजित करण्यात आले होते. सर्वच सामने अत्यंत चुरशीचे व स्पर्धात्मक साहस निर्माण करणारे होते. खेळाडूंचा उत्साह वाढवण्यासाठी दुपारी १:३० ते २:३० या वेळेत सर्व खेळाडूंना स्नेहभोजन देण्यात आले.

शेवटी अंतिम सामना विवेकानंद गुरुकुल व संस्कृती गुरुकुल



विद्यालय यांच्यामध्ये खेळला गेला. अत्यंत रोमहर्षक ठरलेल्या या सामन्यात संस्कृती विद्यालयाने बाजी मारली. या स्पर्धांच्या बक्षीस वितरण सोहळ्यासाठी डॉ. दत्ता नलावडे, रोहिदास रोहिते, भाऊसाहेब सरवदे, बालकाश्रमाच्या अधीक्षिका सविता जाधव, संस्था अध्यक्ष लालाजी जाधव, विजय कुमार गिरे, संतोष देशमुख, काळकुटे आप्पा, धनंजय सोन्ने इ. मान्यवर

पान २ वर